रायगड, शुक्रवार दि. १ डिसेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

माणगाव : माणगाव तालुक्यातील ढालघर येथील तरुणाने घरातील भांडणामुळे नैराश्यातून झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. सदरची घटना गुरुवार २९ नोव्हेंबर २०२३ रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास घडली. आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव विठोबा गणपत तेटगुरे (वय-३२) रा. ढालघर असे आहे. विठोबा आपली पत्नी व आईच्या रोजच्या भांडणाला कंटाळला होता. याच नैराश्यामधून त्याने हे पाऊल उचलले. •➤ पान २ वर

कारला अपघात

म्हसळा : पुणे- हडपसर येथून दिवेआगर येथे फिरण्यासाठी निघालेल्या पर्यटकांच्या कारला म्हसळा तालुक्यातील देवघर येथे पहाटे अपघात झाला. या अपघातात सहा जण जखमी झाले आहेत. अंकुश पवळ -३१ वर्ष, तुकाराम बोळे - ३५ वर्ष, तुळशीराम साबळे - ३८ वर्ष, नवनाथ परभने - ५२ वर्ष, गणेश सुतार-३४ वर्ष, अनुप सोनावणे-३० वर्ष अशी जखमींची नावे आहेत. सहा मित्र अर्टिगा कारमधून दिवेआगर येथे फिरण्यासाठी निघाले होते. गुरुवारी सकाळी सात वाजता त्यांची कार म्हसळा तालुक्यातील देवघरजवळ आल्यावर •➤ पान २ वर

आपली जिव्हाळ्याची बँक... अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि. अलिबाग-रायगड

*सोनेतारण कर्ज किमान व्याजदर द.सा.द.शे 8.50%

१०० दिवस ठेवीकरीता विशेष व्याजदर द.सा.द.शे 6%

*ठेव योजना मर्यादीत कालावधीकरीता
*रु.५,००,०००/- पर्यंतच्या ठेवींना डी.आय.सी.जी.सी मार्फत विमा संरक्षण

कृपया आजच नजिकच्या शाखेत संपर्क साधा.

अलिबाग, चौल, नेरळ, खोपोली, कर्जत, मुरुड, सानपाडा, चाणजे, चेंढरे व पाली.

*अटी व शर्ती लागू.

मतदान चाचण्यांचे कल भाजपला प्रतिकूल

काँग्रेस मारणार बाजी ?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडली आहे. या सर्व राज्यांमध्ये काँग्रेसने भारतीय जनता पार्टीला धूळ चारण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आहेत. निवडणूक निकाल रविवारी तीन डिसेंबर रोजी जाहीर होणार आहेत. त्यापूर्वी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर चाचण्यांचे निकाल भाजपला चिंतेत टाकणारे आणि काँग्रेसला सुखवणारे आहेत. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये सत्ता टिकवण्याचे काँग्रेससमोर आव्हान आहे, तर मध्यप्रदेशमध्ये काँग्रेसने भाजपाला काँटे की टक्कर दिली असून भाजपची सत्ता जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तेलंगणामध्ये बीआरएस प्रमुख के. चंद्रशेखर राव यांची हॅटट्रिक रोखण्यासाठी काँग्रेस आणि भाजप अशी तिरंगी लढत आहे. असे असले तरी येथे देखील काँग्रेस अघाडीवर आहे. मिझोराममध्ये मिझो नॅशनल फ्रंट विरुद्ध काँग्रेसच्या लढतीला यंदा मिझोरम पीपल्स मूव्हमेंट पक्षाचेही आव्हान आहे. यामुळे येथे दोन स्थानिक पक्षांच्या लढतीत काँग्रेसचा फायदा होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

	वाहिनी	काँग्रेस	भाजप
राज्य	एबीपी	८१	१०८
राजस्थान	एक्सिस माय इंडिया	७४	१११
	आजतक	१००६	१००
मध्यप्रदेश	सीएनएक्स	१११	११६
	इंडिया टिव्ही	७४	१५१
	मॅट्रीझ	१०७	१३०
छत्तीसगड	एबीपी	४२	४७
	चाणक्य	६५	४१
	आजतक	५३	४८

छत्तीसगडमध्ये निवडणुकीच्या निकालापूर्वी सत्ताधारी काँग्रेस आणि विरोधी पक्ष भाजप या दोन्ही पक्षांमध्ये खळबळ उडाली आहे. छत्तीसगडमध्ये विधानसभेच्या ९० जागा आहेत, त्यापैकी ७५ जागा जिंकण्याचा काँग्रेसचा दावा आहे. छत्तीसगडच्या एक्झिट पोलच्या निकालानुसार काँग्रेसचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या सरकारविरोधात सत्ताविरोधी लाट नाही. एबीपी-सी व्होटर एक्झिट पोलमध्ये काँग्रेसला कौल देण्यात आला आहे. याठिकाणी ४१ ते ५३ जागा, तर भाजपला ३६ ते ४८ जागा मिळण्याचा अंदाज आहे. इतरांना मिळू शकणाऱ्या जागांचे आकडे १ ते ५ पर्यंत आहेत. ॲक्सिस इंडियाच्या एक्झिट पोलमध्ये छत्तीसगडमध्ये काँग्रेसला ४०-५०, भाजपला ३६-४६ आणि इतरांना १ ते ५ जागा देण्यात आल्या आहेत. राज्यात एकूण ९० जागा आहेत. बहुमताचा आकडा ४६ आहे.

जन की बातच्या मतदानोत्तर चाचण्यांमध्ये राजस्थानमध्ये भाजपला १००-१२२ जागा, काँग्रेसला ६२ ते ८५ जागा देण्यात आल्या आहेत आणि इतरांना एकही जागा देण्यात आलेली नाही. राज्यात एकूण २०० जागा आहेत. येथे सरकार स्थापन करण्यासाठी १०१ जागांची आवश्यकता आहे. राजस्थानमध्ये गेल्या २५ वर्षांपासून प्रत्येक वेळी सरकार बदलण्याची प्रथा आहे. इंडिया टुडे आणि एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार काँग्रेसला इथे ८६ ते १०६ जागांवर विजय मिळण्याचा अंदाज आहे. भाजपला राजस्थानमध्ये ८० ते १०० जागांवर विजय मिळण्याचा अंदाज इंडिया टुडे आणि एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलमध्ये व्यक्त करण्यात आला आहे. तर ९-१८ जागांवर अन्य पक्ष, अपक्ष विजयी होऊ शकतात.

मध्य प्रदेशात काँग्रेसची हवा असल्याचं सांगितलं जात आहे. पण निकाल भलताच लागू शकतो. कारण भाजप आणि काँग्रेसमध्ये इथं काँटे की टक्कर होण्याचा अंदाज मतदानोत्तर चाचण्यांनी वर्तवला आहे. •➤ पान २ वर

क्रीडा संकुलाबाबत जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

आता प्रत्यक्ष कृती कधी ?

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

रायगड जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या समस्यांबाबत अनेक वेळा नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत. याबाबत जिल्हास्तरावर फक्त बैठका घेतल्या जातात. अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातात. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी ॲक्शन मोडवर कधी येणार असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कोविड प्रादुर्भाव संपुष्टात आल्यावर क्रीडा संकुलामधील केंद्र बंद करण्यात आले. आजही या संकुलात आरोग्य विभागाचे साहित्य पडून आहे. संकुल नादुरुस्त स्थितीत आहे. त्याचा परिणाम जिल्ह्यातील खेळावर व खेळाडूवर होत असल्याचे चित्र आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या या क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीकडे प्रशासनाचे आजपर्यंत दुर्लक्ष झाल्याचे दिसले आहे.

यापूर्वी जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक मुंबईत तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली २०२२ मध्ये झाली होती. या बैठकीत संकुलाच्या दुरुस्तीबाबत एजन्सी नेमण्याचा निर्णय घेतला होता. लहान-मोठ्या दुरुस्त्या करण्याच्या सूचनाही त्यावेळी करण्यात आल्या होत्या. मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक झाली. या बैठकीत जिल्हा क्रीडा संकुलाच्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. आरोग्य विभागाच्या ढिसाळ कारभाराचा समाचार जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश देण्यात आले.

त्यानंतर त्यांनी अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारतीबाबत माहिती घेतली. या इमारतीवर करोडो रुपये दुरुस्तीसाठी खर्च केले जात आहेत, रुग्णालयातील •➤ पान २ वर

पुढे काहीच नाही

रुग्णालयाची इमारत सलाईनवर असून अनेक वेळा स्लॅब कोसळले आहेत. काहीजण जखमी झाले आहेत. याबाबत 'कृषीवल'ने अनेकदा आवाज उठविला आहे. जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी देखील रुग्णालयाला मागील दोन महिन्यांपूर्वी अचानक भेट दिली होती. तरीही रुग्णालयाच्या कामकाजात काहीच सुधारणा दिसून आलेली नाही. भेट झाली पण पुढे काहीच नाही अशी स्थिती असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

आजचा अग्रलेख
धमक्या देणारे सरकार

वे|ध|क

तरुणाची आत्महत्या

रसायनी: वावेघर येथे एका तरुणाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. मुस्तफा हसनमुल्ला असे या तरुणाचे नाव आहे. मुस्तफाने घरातील स्नानगृहामधील लोखंडी पाईपला गळफास घेतला. गळफास घेण्याचे कारण समोर आले नाही. •➤ पान २ वर

राष्ट्रवादीचे शिबिर

कर्जत : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या दोन दिवसीय वैचारिक शिबिराला गुरुवारपासून कर्जतमध्ये सुरुवात झाली. येथील रेडीसन हॉटेलमध्ये राज्याच्या विविध भागातील प्रमुख पदाधिकारी, मंत्री, खासदार, आमदार कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. शुक्रवारी शिबिराची सांगता होणार आहे.

कर्जतला हेलिपॅडची प्रतीक्षा

जागेचे हस्तांतरण होऊन देखील कार्यवाही शून्य

नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यासाठी आपत्तीच्या काळात हवाई मदत द्यायची झाल्यास शासनाचे स्वतःचे असे कुठेही हेलिपॅड नाही. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मागणीनंतर कडाव ग्रामपंचायतीने दोन एकर जमीन हेलिपॅड उभारण्यासाठी प्राधिकरणाला दिली. त्या जमिनीचे ग्रामपंचायतकडून हस्तांतरण होऊन देखील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून हेलिपॅड उभारण्याच्या कोणत्याच हालचाली केल्या नसल्याने शासकीय हेलिपॅडची प्रतीक्षा कायम आहे.

कर्जत तालुक्यात मंत्री किंवा मान्यवरांचा दौरा जाहीर झाल्यावर किंवा एखादी आपत्ती आल्यावर शासकीय यंत्रणांची हेलिपॅड उभारण्याची धावपळ सुरु होते. अशावेळी बांधकाम विभागाला तात्पुरते हेलिपॅड बनविण्यासाठी जागेचे नियोजन करावे लागते. शासकीय हेलिपॅड नसल्याने खासगी हेलिपॅडवर मदार ठेवावी लागते. यामुळे २०१६ मध्ये कर्जत तालुक्यात •➤ पान २ वर

मध्यवर्ती ठिकाण..

कडाव ग्रामपंचायतीमध्ये शासकीय हेलिपॅड बनविण्यासाठी दिलेली जमीन तालुक्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्या ठिकाणावरून कर्जत हे तालुक्याचे ठिकाण नऊ किलोमीटर अंतरावर आहे, तर भिवपुरी रोड रेल्वे स्थानक चार किलोमीटर आणि नेरळ स्टेशन ११ किलोमीटर अंतरावर आहे. प्रस्तावित हेलिपॅड येथून माथेरान पर्यटन स्थळ २० किलोमीटर अंतरावर आहे. १०० मीटर अंतरावर शहापूर- मुरबाड-कर्जत-वाकण हा राष्ट्रीय महामार्ग आहे.

खुनातील आरोपी अटक

। पनवेल । वार्ताहर ।

बस आगार परिसरात पनवेल शहर पोलिसांनी दोन बांग्लादेशीय नागरिकांना ताब्यात घेतले असून ते एका खुनप्रकरणातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी अली हाफीज शेख व रविवुल मनन शेख हे संशयीत आरोपी आहेत. अली सफीज शेख, रविवुल मनन शेख व मेसन किसलू मुल्ला अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडे भारतीय नागरीकत्व असल्याची कागदपत्रे मिळाले नाहीत, मात्र बांग्लादेशी असल्याचे पुरावे पोलिसांना तपासात सापडले आहेत. आरोपी पोलिस कोठडीत असताना त्यांच्याकडे बंगाली भाषेतील काही कागद पोलिसांना सापडले. त्यानुसार अधिक माहिती घेतली असता बांग्लादेशातील नरईल जिल्ह्यातील कालिया पोलिसात त्यापैकी दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले.

पोषण आहारात विद्यार्थी खातात अर्धे अंडे

। रायगड । प्रतिनिधी ।

शालेय पोषण आहारात आता अंडी व केळी किंवा इतर स्थानिक फळाचा समावेश करण्यात आला आहे. प्रतिविद्यार्थी पाच रुपयांचा खर्च करावा, असे शासनाचे आदेश आहेत. पण, साडेसहा रुपयांपेक्षा कमी किमतीत अंडे मिळत नाही. गावरान अंड्याची किंमत दहा रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे पोषण आहारात अनेक शाळांना पोषण आहारात एक अंडे अर्धे-अर्धे करून दोन विद्यार्थ्यांना द्यावे लागले आहे.

रायगड जिल्ह्यातील तीन हजार १७ शाळांमध्ये पोषण आहार योजना राबविली जाते. यामध्ये जिल्हा परिषदेच्या दोन हजार ६०० शाळांसह महापालिका , नगरपालिकेच्या ६१ व खासगी अनुदानित ३५६ शाळांचा समावेश आहे. इयत्ता पहिली ते आठवीतील एक लाख ७५ हजार २१६ विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ९८ हजार ४३७, नगरपालिकेच्या शाळांमध्ये ६ हजार २४६ आणि खासगी अनुदानित शाळांमधील ७० हजार ५३३ विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ मिळतो.

शासनाच्या नवीन निर्णयानुसार पोषण आहारासाठी राज्यातील पात्र शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्यास आठवड्यातील प्रत्येक बुधवार किंवा शुक्रवारी एक अंडे आणि अंडी न खाणाऱ्यांना एक स्थानिक फळ देणे अपेक्षित आहे. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर बहुतेक शाळांनी विद्यार्थ्यांना अंडे, अंडा बिर्याणी-पुलाव व फळे दिली. पण, बहुतेक शाळांनी केळी स्वस्त असल्याने त्यांनाच प्राधान्य दिले.

डझनभर केळी ४५ रुपयास मिळत असल्याने शाळांनी पाच रुपयांपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता घेतली. परंतु, कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला अंडे मिळाले. दुसरीकडे विद्यार्थी जास्त असलेल्या शाळांमध्ये मात्र काही प्रमाणात अंड्याचे नियोजन करण्यास अडचणी आल्याचेही सांगण्यात आले. अंडे, फळे शाळांमध्ये पुरविल्यास शिक्षक-मुख्याध्यापकांची धावपळ होणार नाही, असाही एक मतप्रवाह तयार झाल्याचे दिसून आले.

- अंडे ६ रुपयाला अन् निधी ५ रुपये
- दोन विद्यार्थ्यांना वाटून द्यावे लागते अर्धे-अर्धे अंडे

गावरान अंडी शासनाच्या दरात मिळेनात

शासनाच्या नवीन आदेशानुसार प्रतिविद्यार्थी पाच रुपयेच खर्च करायचे आहेत. पण, ना फळ ना अंडे तेवढ्या किमतीत मिळते. गावात कोठे अंडी मिळतात का, याचा शोध काही शाळांमधील शिक्षकांनी घेतला. त्यांना चार-पाच ठिकाणी अंडी मिळाली, पण त्याची किंमत किमान दहा रुपये असल्याने त्या शिक्षकांना तेथून रिकाम्या हाताने परतावे लागले. गावातील दुकानांमधील अंड्याची किंमत सहा रुपये आणि शिजवायचा खर्च वेगळाच, अशीही स्थिती पाहायला मिळाली. या पार्श्वभूमीवर शासनाने आता प्रतिविद्यार्थी सात रुपये द्यावेत, अशी मागणी शिक्षण संचालकांकडे करण्यात आली आहे. त्याठिकाणी सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे, अन्यथा योजना प्रभावीपणे राबविण्यास अडचणी येऊ शकतात.

माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पाठपुराव्याला यश

अलिबागचे समुद्रकिनारे होणार मजबूत

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उधाणामुळे अलिबागमधील समुद्रकिनाऱ्यांची नासधूस झाली असल्याने त्यांच्या मजबुतीकरणासाठी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. अखेर त्यांना यश आले असून या कामाला एमएमबी विभागाकडून मान्यता मिळाली आहे. बंधाऱ्याच्या कामाला काही दिवसांपासून सुरुवात झाली आहे. येत्या दोन महिन्यात काम पूर्ण होण्याची अपेक्षा प्रशांत नाईक यांनी व्यक्त केली आहे.

दरवर्षी सुमारे दोन लाख पर्यटक अलिबागला भेट देतात.

समुद्रकिनारी फिरण्यास येणाऱ्या पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पुढाकारातून अनेक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

शनिवार, रविवार व अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यटकांनी समुद्रकिनारा फुलून जातो. पर्यटकांच्या व स्थानिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंधारे मजबूत करण्यासाठी त्यांनी शासनाकडे निधीची मागणी केली होती. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून मागणीला मंजूरी देण्यात आली. त्यासाठी सुमारे चार कोटी आठ लाख ३३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अलिबाग कोळीवाडा ते हॉटेल सीव्हूवपर्यंत बंधाऱ्यांचे काम केले जाणार आहे. या कामाला काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली असून नाईक यांनी नुकतीच त्याची पाहणी केली.

शॉक लागून बैलाचा मृत्यू

। तळा । प्रतिनिधी ।

शेतात चरायला गेलेल्या बैलाला विजेच्या तुटलेल्या तारेचा शॉक लागून बैलाचा मृत्यू झाल्याची घटना तळा तालुक्यातील वाशी येथे घडली. वाशी परिसरात ही तार तुटून खाली पडली होती. मात्र दुरुस्त करण्यापूर्वीच या वाहिनीतील वीजप्रवाहाचा धक्का लागून चरायला गेलेल्या बैलाचा मृत्यू झाला. हे वीज कर्मचाऱ्याला माहित असून सुद्धा त्याने त्याबतची कोणतीच कल्पना कार्यालयात किंवा गावात दिली नाही. वाशी येथील शेतकरी रमेश पांडुरंग टेमकर चरायला सोडलेल्या बैलाला आणण्यासाठी गेले तेव्हा त्यांना बैल मृत झाल्याचे लक्षात आले. शेतीच्या हंगामात बैल दगावल्याने टेमकर हतबल झाले आहेत.

महावितरणाच्या गलथान कारभारामुळे हा प्रसंग ओढवला असून भरपाई मिळावी अशी मागणी •➤ पान २ वर

कार अपघातात एक ठार, दोन जखमी

। गडब । वार्ताहर ।

पेण-वाशी रस्त्यावरून भाल गावाकडे जाणाऱ्या कारचालकाचे वेगावरील नियंत्रण सुटल्याने कार वाशीच्या प्राथमिक केंद्रानजीक झाडावर आदळली. घडलेल्या अपघातात संतोष म्हात्रे (वय ३९, रा. भाल तामसी बंदर) यांचा मृत्यू झाला. तर कारचालक विश्वास पाटील (वय ५९, रा. ढोलपाडा, पेझारी), प्रसाद शिवदे (वय ४६, रा. आंबेपुर पेझारी) हे जखमी झाले आहेत. जखमींना संजीवनी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर कार जळून खाक झाली आहे. या अपघाताची नोंद वडखळ पोलिस ठाण्यात करण्यात आली असून सहाय्यक पोलिस निरीक्षक अभिजित पाटील अधिक तपास करीत आहेत.

‘हिचडी’ जादा, उत्पन्न कमी

■ मच्छिमारांमध्ये चिंतेचे वातावरण ■ बदलत्या हवामानाचा मोठा फटका

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।
सततच्या बदलत्या हवामानामुळे उलथापालथ होत असून, समुद्रात मोठी मासळी मिळत नसल्याने मच्छिमार हैराण झाले आहेत. पैसे नसल्याने अनेकांना प्रपंच चालविणे अवघड बनले आहे. मुरुड, एकदरा, राजपुरी आदी खाड्यांतून अनेक होड्या समुद्रकिनारी बांधून ठेवण्यात आल्याचे दिसून येत आहेत.

ऐन मोसमात मोठी मासळी किंवा कोलंबीदेखील मिळत नसल्याने मच्छिमारांना प्रपंच चालविणे मुश्किल झालेले दिसून येत आहे. एकदरा येथील काही छोट्या नौकांना छोटी हिचडी (मिक्स अगदी छोटी मासळी) मासळी मिळाल्याचे एकदरा येथील नाखवा रोहन निशानदार यांनी गुरुवारी सांगितले. मोठ्या नौकांची मासेमारी बंद आहे. मासळीला बोली भाषेत ‘खेंगाट’ किंवा ‘हिचडी’देखील म्हटले जाते. ही हिचडी मासळी निवडून साफ करण्यात खूप वेळ खर्च करावा लावतोय. यामध्ये छोटी खेकडी, बारीक ढोमी मासळी मिळते. यातून फारसा आर्थिक फायदादेखील नसल्याने मच्छिमार हैराण झाले आहेत. घरात पैसे नसल्याने कुटुंबप्रमुख हवालदिल आहेत. प्रत्यक्षात मच्छिमारांची आर्थिक कोंडी झाली असून, शासनाकडून पारंपरिक मच्छिमारांना कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य केले जात नसल्याने असंतोष वाढीस लागला आहे, असे सांगण्यात आले.

नाखवा रोहन निशानदार म्हणाले की, मुरूड मार्केटमध्ये अगदी काही प्रमाणात कोलंबी येत असली तरी प्रमाण अल्प असल्याने मासेमारी परवडण्यापलीकडे गेली आहे. हिचडी मासळीमुळे मच्छिमारांचे अतोनात नुकसान होत आहे. रत्नागिरीपासून रायगडपर्यंत समुद्रात कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती असल्याचे अनेक मच्छिमारांनी सांगितले. बाहेरगावांतून मुरूड मार्केटमध्ये मासळी येत असल्याची माहिती मिळाली. वादळी पाऊस, अवकाळी पाऊस, जेलिफिशचे आक्रमण अशा विविध कारणांमुळे मासेमारी सातत्याने बंद पडली होती. आता नवीन प्रकाराला पारंपरिक मच्छिमारांना तोंड द्यावे लागत आहे.

> **बदलत्या वातावरणामुळे मासेमारी वारंवार ठप्प होत आहे. त्यामुळे डिझेल भरून समुद्रात मासेमारीस जाऊन अधिक नुकसान करून घेण्यापेक्षा मच्छिमारांनी नौका किनाऱ्यावरच नांगरून ठेवल्याचे सांगण्यात आले.**
> **– पांडुरंग आगरकर, अध्यक्ष, एकदरा गाव कोळी समाज**

शाळा समितीच्या चेअरमनपदी प्रीतम म्हात्रेंची निवड

। पनवेल । वार्ताहर ।

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या इंदुबाई वाजेकर इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा आणि के.व्ही. कन्याशाळा समितीच्या चेअरमनपदी शाळेचेच माजी विद्यार्थी आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ संजय पाटील यांनी गुरुवारी त्यांना नियुक्तीपत्र दिले.

या अगोदर प्रीतम म्हात्रे यांनी शाळेच्या माध्यमिक विभागाचे शाळा समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे. ते अध्यक्ष असलेल्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या ग्रामीण भागात त्यांच्या स्वतःच्या शाळासुद्धा आहेत. ज्यामध्ये सर्वसामान्यांना परवडेल अशा स्वरूपात शिक्षण सेवा दिली जाते. त्यांनी आजपर्यंत कोकण एज्युकेशन सोसायटीचे शाळा समिती सदस्य म्हणून केलेले काम आणि त्यांचा शिक्षण क्षेत्रात असलेला दांडगा अनुभव पाहता त्यांची नियुक्ती करण्यात आली. शाळेत शिकलेला विद्यार्थी मोठा झाल्यावर त्याने केलेल्या कार्याच्या जोरावर त्याच शाळेत जेव्हा चेअरमन म्हणून येतो तेव्हा हा सन्मान त्या विद्यार्थ्यांचा नसून त्याला घडवणाऱ्या शिक्षकांचा, त्या शाळेचा आणि त्याच्या आई-वडिलांचा असतो अशा प्रकारे भावना आज पनवेलकर व्यक्त करत आहे.

> **माझे बाबा जे.एम. म्हात्रे यांच्याकडून मिळालेल्या शिकवणीमुळे माझ्यासारखेच अनेक तरुण विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करत आहेत. काम करताना ते निःस्वार्थीपणे केले पाहिजे, असे ते नेहमी सांगतात. त्याचीच पोचपावती आज मला माझ्याच शाळेच्या चेअरमनपदी नेमणूक झाल्याबद्दल मिळाली, असे मी समजतो. समस्त पनवेलकरांना अपेक्षित असलेली आपली शाळा आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये एक वेगळा उच्चांक गाठेल अशा प्रकारे सर्व सहकाऱ्यांना घेऊन मी भविष्यात काम करणार आहे.**
> **– प्रीतम म्हात्रे**

पान १ वरून

काँग्रेस मारणार बाजी?

मध्य प्रदेशात एकूण जागा २३० आहेत. यांपैकी बहुमताचा आकडा ११६ आहे. मतदानोत्तर चाचण्यांमधून बहुतांश ठिकाणी काँग्रेस बहुमताचा आकडा गाठू शकते असे अंदाज आहेत. पण काही चाचण्यांमध्ये भाजप या बहुमताच्या जवळ असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळं मध्य प्रदेशातील निकाल हे रंजक असण्याची शक्यता आहे.

हैद्राबाद- तेलंगणामधील सीएनएनच्या मतदानोत्तर चाचण्यांमधून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येत असल्याचं चित्र आहे. तर सत्ताधारी बीआरएसला राज्यात धक्का बसणार आहे. सीएनएनच्या मतदानोत्तर चाचण्यांनुसार काँग्रेसला ५६ जागा मिळतील, तर बीआरएसला ४८ जागांवर समाधान मानावे लागणार आहे. भाजपला १० जागा मिळतील असा अंदाज आहे.इंडिया टिव्ही-सीएनएक्स मतदानोत्तर चाचण्यांनुसार, तेलंगणात बीआरएस ७० जागा जिंकत सत्तेत परत येईल. काँग्रेसला ३४ जागा मिळतील. भाजपला ७ जागांवर समाधान मानावे लागेल. औवैसींचा पक्ष ७ जागा जिंकू शकतं. जन की बात मतदानोत्तर चाचण्यांनुसार , काँग्रेसला ४८ ते ६४ जागा मिळू शकतील. काँग्रेस बीआरएसच्या पुढे जाईल. बीआरएसला ४० ते ५५ जागा मिळू शकतात. तर भाजपला ७ ते १३ जागांवर समाधान मानावे लागेल.

‘‘जन की बात’’ मतदानोत्तर चाचण्यांनुसार, यावेळी मिझोराममध्ये झोरम पीपल्स मूव्हमेंट सरकार स्थापन होऊ शकते. १५ ते २५ जागा मिळतील, असा अंदाज चाचण्यांमध्ये व्यक्त करण्यात आला आहे. तर सत्ताधारी पक्षाला यावेळी १० ते १४ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्या पक्षाला न्यूज १८ मतदानोत्तर चाचण्यांमध्ये झोरम पीपल्स मूव्हमेंटने बहुमताचा जादुई आकडा गाठण्यात यश मिळवले आहे. जनमत चाचण्यांमध्ये जेपीएमला २० जागा मिळताना दिसत आहेत. त्याच वेळी, मिझो नॅशनल फ्रंट १२ जागांसह दुसऱ्या स्थानावर आहे. मिझोरामच्या ४० जागांच्या विधानसभा मतदारसंघासाठी ७ नोव्हेंबरला निवडणुका झाल्या होत्या. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत झोरमथांगाचा पक्ष १० वर्षांचा वनवास संपवून सत्तेत परतला. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत, मिझोरमच्या मिझो नॅशनल फ्रंट आणि त्याचे अध्यक्ष झोरामथांगा यांनी मंगळवारी मिझोराम विधानसभा निवडणुकीत २८ जागा जिंकून जोरदार पुनरागमन केले होते. २०१३ मध्ये मिझोराममध्ये विक्रमी जागा जिंकणारी काँग्रेस तिसऱ्या क्रमांकावर घसरली होती, तर झोरम पीपल्स मूव्हमेंट ८ जागा जिंकून विरोधी पक्षात बसली होती होती.

कर्जतला हेलिपॅडची प्रतीक्षा

मध्यवर्ती ठिकाणी शासकीय हेलिपॅड उभारण्याची मागणी समोर आली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने हेलिपॅड उभारण्याचे प्रयत्न सुरु केले.

जिल्हा प्रशासनाच्या मागणीनुसार कडाव ग्रामपंचायतीने सर्वे नंबर १३ /१/अ या जमिनीतील दोन एकर जमीन शासकीय हेलिपॅड उभारण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. २०२० मध्ये कडाव ग्रामपंचायतीने सदर जमिनीचा ताबा जिल्हा प्रशासनाला दिला. २०२१ मध्ये प्राधिकरणाच्या नावाचा सातबारा तयार झाला आहे. मात्र तेथे हेलिपॅड उभारण्याची कोणतीही हालचाल प्रशासनाने केलेली नाही.

पूर्वीचे नियोजन...

कर्जत तालुक्यात शासकीय कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री किंवा राज्यपाल आणि अन्य महत्वाच्या व्यक्ती येत असतात. त्यांच्यासाठी शासकीय हेलिपॅड उपलब्ध नसल्याने खासगी हेलिपॅडवर त्यांचे हेलिकॉप्टर उतरविले जाते. त्यात टाटा कंपनीचे भिवपुरी येथील आणि कर्जत- चौक रस्त्यावर एनडी स्टुडिओ येथील हेलिपॅडचा वापर केला जात आहे. नेरळ येथील कोतवालवाडी आणि कर्जत मार्केट यार्ड येथे देखील हेलिकॉप्टर उतरविण्याची व्यवस्था गरजेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते.

आता प्रत्यक्ष कृती कधी?

कर्मचारी याबाबत चिंताग्रस्त आहेत.

जिल्हा क्रीडा संकुलासह जिल्हा सामान्य रुग्णालयातील विविध प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी वारंवार बैठका घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देतात. मात्र या सूचना फक्त कार्यालयाच्या चार भिंतीच्या पलिकडे जात नसल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. रुग्णालयाला स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी भेट देऊन तेथील दुरवस्थेची पहाणी केली. त्यामुळे बैठका संपल्यावर पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी परिस्थिती सध्या सुरु आहे. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी फक्त निर्देशच देणार की ॲक्शन मोडवर कधी येणार असा प्रश्न रायगडकरांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

शॉक लागून बैलाचा मृत्यू

गावकऱ्यांनी केली आहे. याबाबत पशुधन अधिकारी आणि तलाठी यांना कळविण्यात आले असून, पंचनामा करण्यात येणार आहे. यासंदर्भात महावितरणचे उपभियंता महेंद्रकर यांच्याकडे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, वाशी गावात घडलेली घटना दुर्दैवी आहे. संबंधित घटनेचा पंचनामा करण्यात आला असून वरिष्ठांना त्याबाबत कळविले आहे. शेतकऱ्याला योग्य ती नुकसानभरपाई देण्यात येईल.

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

त्याने गळफास घेतला. त्याला उपचाराकरिता रुग्णवाहिकेमधून माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तो मृत झाल्याचे घोषित केले. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिष अस्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार निमकर हे करीत आहेत.

कारला अपघात

एका अवघड वळणावर कलंडून अपघात झाला. या अपघातात दोघे जखमी झाले तर चार जणांना किरकोळ दुखापत झाली. जे. एम म्हात्रे कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी जखमींना गाडीतून बाहेर काढले. यामध्ये दोन जणांच्या पायाला व कमरेला मार लागल्याने त्यांना म्हसळा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर अन्य चौघांवर घटनास्थळीच प्राथमिक उपचार करण्यात आले.

तरूणाची आत्महत्या

याबाबत हसनमुल्ला नसीबमुल्ला शेख यांनी रसायनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अंमलदार एस. के. चौरे अधिक तपास करीत आहेत.

मुरुडला चित्रबद्ध करणार मुंबईचे चित्रकार

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुडला बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील कला अकादमीतर्फे महापालिका कलाशिक्षक व ख्यातमान चित्रकार यांच्यासमवेत मुरुड, जंजिरा व परिसरात आर्टिस्ट कॅम्प दि. २९, ३० नोव्हेंबर, ०१ व २ डिसेंबर २०२३ मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

मुरुडला निसर्गाने इतकं सुंदर बनवले आहे की, कोणत्याही कोपरीवर उभे राहा तुम्हला निसर्ग हिरवाईने नटलेला दिसणार, पारंपरिक वेशभूषा, ऐतिहासिक जलदुर्ग, गारंबीसारखे जलस्तोत्र, नवाबी राजवाडे आणि स्वच्छ सुंदर विशाल समुद्रकिनारा यांचे चित्र पुढील तीन दिवस मुंबईचे २० चित्रकार काढणार आहेत. पहिल्या दिवशी चित्रकार गणेश हिरे यांच्या प्रात्यक्षिकाने या कार्यक्रमाची सुरूवात झाली.

या कॅम्पमध्ये समुद्रकिनारा, ऐतिहासिक किल्ले ,कोळीवाडा, ग्रामीण जीवन अशा विविधतेने नटलेल्या वेगवेगळ्या नयनरम्य ठिकाणी प्रत्यक्ष चित्रणाची संधी सहभागी कला शिक्षकांना उपलब्ध होईल. या कॅम्पमध्ये तयार करण्यात आलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन दि. ०५ ते ११ मार्च २०२४ या कालावधीत नेहरु सेंटर कलादालन, वरळी येथे भरविण्यात येणार आहे.

या कॅम्पचे आयोजन शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, शिक्षणाधिकारी माध्यमिक राजू तडवी व उपशिक्षणाधिकारी सुजाता खरे यांच्या मार्गदर्शनाखाली कला प्राचार्य दिनकर पवार यांनी निदेशक मंजिरी राऊत, भूषण उदगीरकर, योगेश मोरे, प्रफुल्लता कुंभार व निनाद पाटील यांच्या सहकार्याने केले आहे.

पन्नास टक्के शिक्षकच कार्यरत

जिल्हा परिषदेच्या शाळांची बिकट अवस्था

। म्हसळा । वार्ताहर ।

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती अत्यंत बिकट झाली असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची ऐशीतैशी झाल्याचा प्रकार समोर येत आहे. एकूण मंजूर शिक्षकांपैकी जेमतेम ५० टक्केच शिक्षक कार्यरत असून, ११ पैकी एकही केंदप्रमुख कार्यरत नाही. शाळेतीलच शिक्षकांकडे केंद्रप्रमुखांचा कार्यभार देऊन सर्व कारभार वाऱ्यावर सोडल्यासारखी अवस्था पहावयास मिळत आहे, अशी माहिती माजी सभापती रवींद्र लाड यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट घेत दिली.

यावेळी त्यांनी सांगितले की, शिक्षकांच्या जिल्हा बदलीमुळे अनेक शिक्षक हे न्यायालयात गेले, त्यामुळे गेली वर्षभर तालुक्यातील शिक्षणाचा पाया घसरला. अनेक मराठी शाळा शिक्षक नसल्याने ओस पडू लागल्या आहेत. अनेक ठिकाणी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात पट असल्याने तिथे दोन किंवा तीन शिक्षकच शिक्षणाचा गाडा हाकत आहेत.

स्थानिक सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे, तो प्रस्ताव गटशिक्षणाधिकाऱ्यांनी पाठवलेला आहे, त्याला त्वरित मंजुरी मिळावी, तसेच जिल्ह्यात अनेक सुशिक्षित डी. एड. पदवी प्राप्त बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधीची वाट बघत असताना त्यांच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी डॉ. बास्टेवाड यांच्या निदर्शनास आणून दिले.

जलजीवन योजनेचे तालुक्यात तीनतेरा वाजले आहेत, अनेक ठिकाणी निष्कृष्ट दर्जाचे काम झाले आहे त्यांची पाहणी करावी, तालुक्यातील आरोग्याची ग्रामीण भागात बिकट अवस्था असून, खरसई, जांभुळ, नेवरुळ, कोळे हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करुन मिळावे, अशी मागणी रवींद्र लाड यांनी भेटीदरम्यान केली. यावेळी डॉ. बास्टेवाड यांनी लवकरात लवकर तालुक्यातील शिक्षणाचा पाया सुधारला जाईल व सेवानिवृत्त शिक्षक भरती लवकरच पूर्ण करण्यात येईल तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रदेखील सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

निकृष्ट साईडपट्टीमुळे अपघाताचा धोका

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम अर्धवट आहे. परंतु, ज्या ठिकाणचे काम पूर्ण झाले आहे, त्या रस्त्याच्या साईडपट्ट्यांचे काम निकृष्ट दर्जाचे असून, अपघाताचा धोका आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते किशोर वडे यांनी व्यक्त केले आहे.

महामार्गच्या चौपदरीकरणाचे काम गेली सतरा वर्षांपासून सुरु आहे. सुरवातीला काही वर्षे खडीमिश्रित डांबर टाकून करण्यात आले, परंतु ते काही टिकेना. यामुळे शासनाच्या तिजोरीतून करोडो रुपये वाया गेल्याचा आरोप श्री. वडे यांनी केला आहे. गेल्या वर्षी सिमेंट काँक्रिटचा रस्ता बनविण्याचा निर्णय घेण्यात आला. काही ठिकाणचा रस्ता पूर्ण झाला आहे. त्या ठिकाणची बिले काढण्यासाठी जणू ठेकेदारांना घाई झालेली असून, म्हणूनच साईडपट्ट्यांचे काम करण्यासाठी सुरुवात केली आहे. परंतु, त्या साईडपट्ट्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे वडे यांचे म्हणणे आहे.

ज्या ठिकाणचे सिमेंट काँक्रिटचे काम पूर्ण झाले आहे, त्या ठिकाणची रस्त्यावर असणारी सिमेंटची धूळ तशीच असल्यामुळे महामार्गावरील रस्त्यावर प्रचंड धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६
दुरध्वनी कार्यालय - ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय - ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय- ०२२-२७४५२३३९
ई मेल-pavelcorporation@gmail.com वेबसाईट-www.panvelcorporation.com

जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिकेची सरळसेवा पदभरती २०२३ जाहिरात दि. १३/०७/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याकरीता पनवेल महानगरपालिकेने परीक्षेचे वेळापत्रक निश्चित केले असून सदरचे वेळापत्रक खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ.क्र.	दिनांक	वार	सत्र
१	०८ डिसेंबर, २०२३	शुक्रवार	प्रथम सत्र- सकाळी ०९.०० ते ११.०० द्वितीय सत्र- दुपारी ०१.०० ते ०३.०० तृतीय सत्र- सायंकाळी ०५.०० ते ०७.००
२	०९ डिसेंबर २०२३	शनिवार	प्रथम सत्र- सकाळी ०९.०० ते ११.०० द्वितीय सत्र- दुपारी ०१.०० ते ०३.०० तृतीय सत्र- सायंकाळी ०५.०० ते ०७.००
३	१० डिसेंबर २०२३	रविवार	प्रथम सत्र- सकाळी ०९.०० ते ११.०० द्वितीय सत्र- दुपारी ०१.०० ते ०३.०० तृतीय सत्र- सायंकाळी ०५.०० ते ०७.००
४	११ डिसेंबर २०२३	सोमवार	प्रथम सत्र- सकाळी ०९.०० ते ११.०० द्वितीय सत्र- दुपारी ०१.०० ते ०३.००

तसेच पनवेल महानगरपालिकेच्या पदभरती संकेतस्थळावर उमेदवारांकरीता दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० पासून प्रवेशपत्र प्राप्त करून घेणेकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सर्व उमेदवारांनी आपल्या लॉगीन आयडी व पासवर्ड द्वारे आपले प्रवेशपत्र उपलब्ध करून घ्यावेत.

जा.क्र.:- पमपा/आस्था/२९२३/प्र.क्र. १३/१४२३/२०२३
दिनांक : ३०/११/२०२३ सही/-
ठिकाण : पनवेल **(गणेश देशमुख)**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे- पोटल, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
अजमद अब्दुल खान (पठान) वगैरे ७	६१	७	०-००-८८	०-०४
गेलाराम भेरोमल	६१	७	०-०३-६२	०-१६
अमजद अब्दुल खान (पठान) वगैरे ७	६१	८	०-०३-२५	०-०५
गेलाराम भेरोमल	६१	८	०-१३-४५	०-२०

सदरची जमीन मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती ह्या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अधिवक्ता
स्वप्नील बाबूराव देशमुख
दि. ०१/१२/२०२३ ऑफिस पत्ता : शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री.प्रथमेश रोहिदास मोरे, मु. सुगवेकरआळी, मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१ यांनी खालील नमूद शेतजमीन मिळकत त्याचे मालक १) सुधीर तानाजी भोईर, २) दिपक तानाजी भोईर, ३) दिनानाथ आत्माराम भोईर, ४) सचिन आत्माराम भोईर, ५) विजय शिवाजी भोईर सर्व रा. जिते,ता. कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

मौजे- जिते, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड येथील शेतजमिन मिळकत

सर्व्हे क्रमांक	हिस्सा क्रमांक	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये-पैसे
८४	२/५/क/१/१/अ/२	०-४७-५० पो.ख.०-०६-०० एकूण ०-५३-५०	०-४०

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक ३० नोव्हेंबर २०२३
प्रांजली प्रथमेश मोरे
एम.ए.एल्एल्.बी.
अधिवक्ता
एन्रोलमेंट क्रमांक
एमएएच/५०८१/२०२१
७, तळमजला, जय नारायण कॉम्प्लेक्स,
अंबिका नाका, मु.पो. नेरळ, ता. कर्जत
जि. रायगड ४१०१०१ भ्रमणध्वनी : ९३७१७०१६०२
adv.pranjalimore@gmail.com

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. सुनिल रामराव पारसकर व श्री. निरज नाथ यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं. २२/४ एकूण ४.७९.०० पैकी ०.२२.८५ जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.
दिनांक :- ०१-१२-२०२३

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता- मु.पो.कडाव, ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.
S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

TENDER NOTICE
SECURITY SERVICES
CONCOR invites sealed tender for the following work :-

Tender N. & Date	Ref.: SGM Dated 05/11/2023 CONCOR/IBG/SOC/ Security Services /2023-2024 Dt. 01/12/2023
Description of Work	Tender for hiring of Security Services
Cost of Tender Document	Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST
Earnest Money Deposit	Rs. 1,00,000/- (Rs. One Lakh Only)
Mode of Payment (Bank Details)	Draft favoring “Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd.” at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch
Contract Period	1 year
Dt. of Sale of Tender Document	From 01/12/2023 TO 10/12/2023 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 10/12/2023
Tender Opening Date: 11/12/2023-11.00 a.m. at Society Office

तारीख : ०१-१२-२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ : पनवेल **इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.**



जमीन मालकांच्या सहभागातून नैनाची उभारणी

प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळाभोवतालच्या प्रदेशाची होणारी संभाव्य अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी विमानतळाभोवतालच्या परिसरात नियोजनबद्धरीत्या नवीन शहर विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. हे नवीन शहर (नैना) विकसित करण्याची जबाबदारी राज्य शासनाने सिडकोवर सोपविली. विमानतळाभोवतालच्या ३७१ चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये सिडकोतर्फे नैना शहर विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्प क्षेत्रामध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल (९२ गावे), पेण (७७ गावे) आणि उरण (५ गावे) तालुक्यांतील १७४ महसुली गावांचा समावेश आहे. नैना प्रकल्पाचे मुंबई आणि नवी मुंबई शहरांशी असलेले सान्निध्य लक्षात घेता हे शहर पर्यावरणदृष्ट्या शाश्वत पद्धतीने विकसित करण्याचा विचारही पुढे आला.



पार्श्वभूमी

महाराष्ट्र शासनाने १० जानेवारी २०१३ च्या अधिसूचने अन्वये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रा (नैना) करीता सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची नियुक्ती केली. सदर अधिसूचनेत रायगड जिल्हयातील २५६ तर ठाणे जिल्हयातील १४ गावातील मिळून एकूण २७० गावे अंतर्भूत होती. या प्रकल्पातील सेवा सुविधा विकसित करण्यात खाजगी जमीन मालकांचा सहभाग या संकल्पनेवर नैना प्रकल्प आधारभूत आहे. या प्रकल्पात जमीन एकत्रिकरण योजनेद्वारे प्राधिकरणास प्राप्त झालेली विकास केंद्रातील जमीनीची विक्री करुन मिळालेल्या निधितून भौतिक सेवा सुविधांचे जाळे निर्माण करणे तसेच जमीन एकत्रिकरणास प्रोत्साहन देऊन नियोजित विकास साधण्याकरीता सिडकोची भूमिका सुलभक (Facilitator) म्हणून आहे.

नैना प्रकल्पाचे क्षेत्र कोणते आहे?

प्रारंभी ५५८ चौ.किमी. (अंदाजे) च्या नैना प्रकल्प क्षेत्रामध्ये रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, कर्जत, खालापूर आणि पेण तालुके आणि ठाणे तालुक्यातील १७४ महसुली गावांचा होता. त्यानंतर विविध अधिसूचनांद्वारे एमएसआरडीसी, एमआयडीसीकरिता काही गावे वगळण्यात आली व नुकत्याच जारी करण्यात आलेल्या अधिसूचनांद्वारे खालापूर व ठाणे तालुक्यांलगत असलेली गावे रद्द करण्यात आल्याने गावांची संख्या १७४ पर्यंत आली. सद्यस्थितीत नैना क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील पनवेल (९२), पेण (७७) आणि उरण (५) तालुक्यांतील १७४ महसुली गावांचा समावेश होत असून प्रकल्प क्षेत्रफळ ३७१ चौ.किमी. आहे.

प्रकल्पाची प्रचंड व्याप्ती पाहता, प्रकल्प क्षेत्रातील परिणामस्वरूप विकासाचे वैविध्य लक्षात घेता, ज्या ३७ चौ.किमी. क्षेत्रातील २३ गावांचा तातडीने विकास करणे आवश्यक होते, अशा गावांसाठी अंतरिम विकास आराखडा तयार करण्यात आला. अंतरिम विकास आराखड्याला २७.०४.२०१७ रोजी शासनातर्फे मंजुरी देण्यात आली व ०१.०३.२०१९ रोजी वगळलेल्या भागास मंजुरी देण्यात आली. उर्वरित १५१ गावांच्या विकास आराखड्यास १६.०९.२०१९ रोजी शासनातर्फे मंजुरी देण्यात आली.

नगर नियोजन क्षेत्रातील अग्रणी प्राधिकरण असणाऱ्या सिडकोकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाभोवतालच्या ३७१ चौ.कि.मी. प्रदेशात नैना हे अत्याधुनिक शहर विकसित करण्यात येत आहे. नगर रचना परियोजनांच्या माध्यमातून या प्रकल्पातून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पाशी संबंधित घडामोडींचा हा आढावा ...

नैनाची वैशिष्ट्ये

- जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांनी परिपूर्ण, कार्यक्षम सार्वजनिक परिवहन व्यवस्था, सर्व उत्पन्न गटांसाठी परवडणाऱ्या दरातील घरे असणाऱ्या आणि पर्यावरणपूरक विकासावर आधारित शहराची निर्मिती करणे
- प्रकल्प आर्थिकदृष्ट्या शाश्वत व्हावा याकरिता जमिनीचा स्रोत म्हणून वापर करणे
- जमीन मालकांना नगर रचना परियोजनांमध्ये सहभागी करून त्यांच्या जमिनीच्या क्षमता वृद्धिंगत करण्याची संधी उपलब्ध करून देणे

नगर रचना परियोजनांची प्रमुख वैशिष्ट्ये

- जमीन विकासासाठी जमीन मालकांचे समान योगदान
- प्रत्येक योजनेसह विकास आराखड्यातील ४०% आरक्षित जमिनीचा विकास
- कमाल २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असलेला एकूण ४०% भूखंड हा अंतिम भूखंड म्हणून जमीन मालकांना देण्यात येईल
- शक्यतो बांधकामे संरक्षित राहतील - सध्या अस्तित्वात असलेल्या बांधकामाभोवती अंतिम भूखंड
- सर्व पायाभूत सुविधा सिडकोतर्फे विकसित करण्यात येणार
- किमान ४५ फुट रुंद रस्ते
- अंतिम भूखंड हे नियमित आकाराचे व बांधकामयोग्य
- शक्यतो मूळ जमिनीलगत अंतिम भूखंड देण्यात येणार
- गॅस पाईप लाईन, नदी व ब्लू लाइन यांमधील आणि एमएसईबी कॉरिडॉर खालील जमीन - भाररहित अंतिम भूखंड देण्यात येणार
- सार्वजनिक वापराकरिता १०% खुली जागा आणि ५% सोयी सुविधा
- वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाकरिता एकाच जमीन मालकाच्या विखुरलेल्या जमिनींचे एकत्रीकरण करण्याची सुविधा
- चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वापराकरिता दोन बाजूंकडील व मागील खुल्या जागांसाठी मर्यादा शिथिल
- ४००० चौ.मी. वरील अंतिम भूखंडाकरिता स्वतंत्र अंतर्गत खुली जागा

'नैना' प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

- मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मल्टि-मोडल कॉरिडॉ (एमएमसी) द्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी नियोजित
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास मेट्रोद्वारे कनेक्टिव्हिटी
- बाजारातील मागण्यांचा अभ्यास करून विविध क्षेत्रांमध्ये विभाजन
- परिवहन केंद्रीत विकासाकरिता मोक्याच्या ठिकाणी विकास केंद्रे नियोजित
- शैक्षणिक आणि आरोग्यविषयक सुविधा विकसित करण्यासाठी खासगी क्षेत्राला प्रोत्साहन
- शाश्वत शहर आणि द्वितीय स्तरीय पायाभूत सुविधा विकसित करण्याकरिता सिडकोचा दूरदर्शी नियोजनाचा अनुभव

नगर रचना परियोजना

- राज्य शासनाने २०१७ मध्ये नैना प्रकल्पाची अंमलबजावणी नगररचना परियोजनांच्या (ढ्झड) माध्यमातून करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार २०१७ आणि २०१९ मध्ये मंजूर झालेल्या विकास आराखड्याची अंमलबजावणी १२ नगररचना परियोजनांच्या (ढ्झड) माध्यमातून करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या प्रभावी व जलद अंमलबजावणीसाठी नगर रचना परियोजनांच्या माध्यमातून शहरांचा विकास करण्यासंदर्भात महाराष्ट्र हे आघाडीवर असलेले राज्य आहे. नैना प्रकल्पाच्या निमित्ताने सुमारे तीन दशकांच्या दीर्घ कालावधीनंतर महाराष्ट्रामध्ये नगर विकासासाठी नगर रचना परियोजनांचा अवलंब करण्यात येत आहे.

नैना प्रकल्प - थिम सिटी संकल्पना

- जगभरातील गुंतवणूकदार गुंतवणुकीकरिता इच्छा प्रदर्शित करत असल्याने नागरिक, शहर आणि देश यांच्या विकासाकरिता थिमवर आधारित विकासाचा दृष्टीकोन उपयुक्त ठरतो.
- विविध देशांना गुंतवणुकीसाठी वेगवेगळे पर्याय असणार आहेत. यामुळे रोजगाराच्या संधी, शैक्षणिक सुविधा, सामाजिक सर्वसमावेशकता वाढीस लागून जीवनमान उंचावण्यासही मदत होणार आहे.
- नैना प्रकल्पातील १५१ गावांच्या विकास आराखड्यात, ज्या क्षेत्रामध्ये विकास नियंत्रित करण्याची आवश्यकता असेल, अशा क्षेत्रांकरिता मर्यादित विकास क्षेत्र (एलडीझेड) प्रस्तावित आहे. तसेच थिम आधारित प्रस्तावांकरिता नैनाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष विनियम अंतर्भूत करण्यात आला आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती

- अंतिम नगर रचना परियोजना क्र. १ व २ तसेच प्राथमिक नगर रचना परियोजना क्र. ३ यांना शासनाची मंजुरी मिळाली आहे. नगर रचना परियोजना क्र. ४, ५, ६ व ७ यांच्या प्रारुप परियोजनांना शासनाची मंजुरी मिळाली असून या परियोजनांच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनातर्फे लवादाची नियुक्ती झाली आहे.

स्मार्ट शहरांसाठीच्या थिम

- **बंदर शहर :** बंदराचा परिसर, वखारी आणि संबंधित कार्यालये
- **मेड सिटी :** उत्तम वैद्यकीय सुविधा आणि मल्टि-स्पेशालिटी हॉस्पिटल
- **स्पोर्ट सिटी :** सर्व महत्त्वाच्या खेळांकरिता प्रबोधिनी आणि प्रशिक्षण केंद्रे (फॉर्म्युला १ रेस ट्रॅकसह)
- **नॉलेज सिटी :** विद्यापीठे, महाविद्यालये आणि प्रशिक्षण केंद्रे
- **रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट झोन :** संशोधन आणि विकास क्षेत्र
- **इको - टुरिझम :** मनोरंजन, फिल्म सिटी

अंमलबजावणीला वेग

नैना प्रकल्पाच्या अंमलबजावणीला वेग प्राप्त व्हावा या दृष्टीने काही सकारात्मक घडामोडी घडल्या आहेत. नगर रचना परियोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जमीन मालकांचे हक्क बदल करून नोंदी ठेवणे, प्रॉपर्टी कार्डस तयार करणे, जमिनीचा मोजणी करणे, नव्याने नकाशे तयार करणे इ. कामांसाठी महसूल व भूमि अभिलेख अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. हे लक्षात घेऊन नैना प्रकल्पाकरिता राज्य शासनाने उप-जिल्हाधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, उप अधिक्षक भूमि अभिलेख, शिरस्तेदार, निमतादार आणि सर्व्हेअर अशी एकूण २२ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे नैना प्रकल्पाशी संबंधित कामे पार पाडण्याकरिता सिडकोकडे स्वत:चे अतिरिक्त आणि समर्पित मनुष्यबळ असणार आहे. यामुळे नैना प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत करणे सुकर होणार आहे.

नैना प्रकल्पातील परियोजना क्र. २ अंतर्गत येणाऱ्या चिपळे, विहीघर, देवद, भोकरपाडा, वेलवली व सांगाडे गावातील एकूण १७ खातेदारांना (भूधारकांना) लवादांकडून निश्चित केल्याप्रमाणे अंतिम भूखंडांची चर्तु:सिमा प्रत्यक्ष जागेवर दाखवून अंतिम भूखंडाचा ताबा दिनांक १२ मे २०२३ रोजी हस्तांतरित करण्यात आला. नैना प्रकल्पाची सुरुवात झाल्यापासून आज प्रथमत:च परियोजना क्र. २ अंतर्गत येणाऱ्या गावांतील खातेदारांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या विकासासोबतच यातून भूधारकांचेदेखील जीवनमान उंचावणार आहे. त्यांना देखील त्यांचे उज्वल भविष्य साकारण्याची संधी मिळणार आहे.

सिडकोतर्फे विकसित करण्यात येत असलेला नैना प्रकल्प हा नवी मुंबई प्रकल्पाप्रमाणेच नगर नियोजन क्षेत्रातील एक आदर्श प्रकल्प ठरेल व या प्रकल्पाच्या रूपाने मुंबई महानगर प्रदेशात अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे जागतिक दर्जाचे शहर उदयास येईल. केवळ नवी मुंबईच्याच नव्हे तर देशाच्या विकासातही या प्रकल्पाचे महत्त्वाचे योगदान असेल.

श्री. एकनाथ शिंदे,
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

नवी मुंबईला एका वेगळ्याच उंचीवर नेणाऱ्या प्रकल्पांपैकी नैना हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने सिडकोची नगर नियोजनातील कामगिरी अधिक झळाळून उठणार आहे. विविध क्षेत्रांच्या विकासाला चालना देण्यासह राज्याच्या आर्थिक विकासालाही हा प्रकल्प निश्चितपणे गती देणारा ठरणार आहे.

- श्री. देवेंद्र फडणवीस,
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सुनियोजित नगरांचा विकास करण्याबाबत महाराष्ट्राने देशात आदर्श प्रस्थापित केला आहे. सिडको विकसित करत असलेले नैना हे अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण शहर हेही नगर विकासाच्या बाबतीत संपूर्ण देशात आदर्श ठरणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे उदयास येणाऱ्या उपक्रमांकरिता नैना शहर पूरक ठरणार असून राज्याच्या विकासाकरिता भरीव योगदान देण्याची क्षमता नैना प्रकल्पामध्ये आहे.

- श्री. अजित पवार
मा. उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

नैना प्रकल्पाची अंमलबजावणी १२ नगर रचना परियोजनांच्या (टीपीएस) माध्यमातून होत आहे. टीपीएसमधील गावांतील जमिनींचा विकास करण्यात येत आहे. शिक्षण, आरोग्य, वाणिज्यिक, पर्यटन, अतिथ्य इ. विविध क्षेत्रांतील उपक्रमांना सामावून घेणारे नैना हे अत्याधुनिक शहर म्हणून उदयास येणार आहे.

श्री. अनिल डिग्गीकर
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

धमक्या देणारे सरकार

राज्य व केंद्रातले मंत्री स्वतःला सेवक वगैरे म्हणवतात. प्रत्यक्षात ते स्वतःला सत्तेचे मालक समजतात. याचे जाहीर प्रदर्शनही अधूनमधून होत असते. २६ नोव्हेंबरला कामगार व शेतकरी यांचा राज्यव्यापी मोर्चा मुंबईत काढण्यात येणार होता. मात्र त्याला परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे कार्यकर्त्यांना जिल्ह्यांच्या ठिकाणीच मोर्चे काढावे लागले. मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे हे सध्या सरकारचे लाडके आहेत. त्यांच्या काही सभा तर मध्यरात्रीही झाल्याच्या बातम्या आहेत. तिथे लाऊडस्पीकरची बंदी मोडण्यात आली. सरकारातील मंत्री विरोधकांवर वाटेल तशी टीका करतात. मात्र विरोधक काही बोलल्यावर मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी यांच्याप्रमाणे थेट अटक करतात. हे सत्तेचे मालक जनतेला भुलवण्यासाठी वाटेल त्या थापा मारतात हेही वेळोवेळी उघड झाले आहे. मात्र जनतेने त्याबाबत प्रश्न मात्र विचारता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो. राज्याचे शिक्षणमंत्री व शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांच्या बीडमधील एका कार्यक्रमात हेच दिसून आले. तेथे एका जाहीर कार्यक्रमानंतर केसरकर पत्रकारांशी बोलत असताना एका मुलीने त्यांना शिक्षक भरतीसंबंधात प्रश्न विचारला. त्यावर केसरकर खवळले व त्यांनी या मुलीला आगामी भरतीमधून अपात्र करण्याची धमकी दिली. कोमल रामपूरकर नावाची ही मुलगी हिंगोलीतील असून तिने गणित विषयात एमएससी केले आहे. तिचे बीएड झाले असून शिक्षक भरतीसाठी लागणाऱ्या दोन्ही पात्रता परीक्षांमध्येही ती चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण आहे. या दोन्ही पात्रता मिळवलेल्या उमेदवारांनी पवित्र या सरकारी पोर्टलवर आपली नोंदणी करणे आवश्यक असते. त्यानुसार तिने ती केली आहे. कोणत्या जिल्ह्यात व कोणत्या पदासाठी आपण अर्ज करीत आहोत हे सांगणे हा त्याचा पुढचा टप्पा असतो. मात्र त्यासाठी कोणत्या जिल्ह्यात कोणत्या शिक्षकांसाठी किती पदे आहेत याची आकडेवारी सरकारतर्फे जाहीर केली जाणे अपेक्षित असते. प्रत्यक्षात गेल्या अनेक महिन्यांपासून हा तपशीलच जाहीर न केल्याने उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. त्यांच्या संघटनांचे आंदोलनही चालू आहे.

भरतीची नुसतीच हुलकावणी

कोमलने नेमका हाच प्रश्न केसरकरांना विचारला. त्याचे उत्तर तर त्यांच्यापाशी नव्हतेच, पण त्यांनी तिला उलट धमकावण्याचा प्रयत्न केला. गेली अनेक वर्षे शिक्षक भरती होणार असल्याबद्दल सरकार नुसतीच आश्वासने देत आहे. एका अंदाजानुसार राज्यातील जिल्हा परिषदा, पालिका इत्यादींच्या सरकारी शाळा तसेच खासगी अनुदानित शाळांमध्ये सुमारे ६४ ते ७० हजार पदे रिकामी आहेत. काहींच्या मते हा आकडा त्याहूनही अधिक आहे. यंदा पावसाळी अधिवेशनामध्ये या भरतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यापूर्वी देवेंद्र फडणवीस व इतर मंत्र्यांनी तीस हजार शिक्षकांची भरती होणार असल्याचे सभा वा पत्रकार परिषदांमध्ये सांगितले होते. परवा बीडमध्ये बोलतानाही केसरकरांनीही हाच आकडा सांगितला. मात्र त्याबाबत स्पष्टता नाही. जिल्ह्याजिल्ह्यांमधील रिक्त जागा तसेच नियमानुसार त्यामध्ये करावयाची मागासवर्गीयांची भरती याबाबतचा तक्ता तयार करण्याचे काम गेले अनेक महिने चालू आहे. या तक्त्याला शिक्षणाधिकाऱ्यांकडून मंजुरी घ्यावी लागते. साहजिकच हे काम रेंगाळवत ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणेत अनेक टेबले आहेत. येथे नेमके तेच घडले असून अनेक जिल्ह्यांचा रिक्त जागांचा तपशील अजूनही मिळालेलाच नसल्याची सबब दिली जात आहे. मुळात ही शिक्षक भरती जाहीर झाली गेल्या वर्षी. त्यानंतर गेल्या वर्षअखेर टेट ही पात्रता चाचणी परीक्षा झाली. ती उत्तीर्ण झालेल्यांसाठी दुसऱ्या टप्प्यातील चाचणी (टीएआयटी) फेब्रुवारी महिन्यात झाली. त्यात सुमारे दोन लाख १६ हजार उमेदवार उत्तीर्ण झाले असून ते प्रत्यक्ष भरतीची वाट पाहत आहेत. एरवी हे सरकार गतिमान असल्याचे शिंदे व फडणवीस लोकांच्या कानीकपाळी ओरडून सांगत असतात. त्या सरकारला शिक्षकांच्या रिक्त जागांचा तपशील मिळवण्यासाठी आपल्याच यंत्रणेला कालमर्यादा घालून देता येऊ नये हे आश्चर्यकारक आहे. यामुळे मुळात सरकारलाच ही भरती करण्यात रस नाही असा निष्कर्ष कोणी काढला तर त्याला दोष देता येणार नाही.

दरडावणे थांबवा

सरकारी कर्मचाऱ्यांपेक्षा खासगी कंपन्यांमध्ये कमी खर्चात लोक कित्येक पट जास्त काम करतात असे मत या सरकारातले अर्थमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते. हीच राज्य सरकारची खरी मानसिकता आहे आणि उल्टा चोर कोतवाल को डाँटे या न्यायाने कोमलला दरडावणारे केसरकर हाच या सरकारचा खरा चेहरा आहे. राज्यात यापूर्वीची शिक्षकभरती २०१७ मध्ये झाली होती. त्यावेळी वीस हजार पदांची गरज असताना केवळ चार हजार पदे भरली गेली होती. त्यानंतर पाच वर्षांनी आपण पहिल्यांदाच भरती करत असल्याची घोषणा करून त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न शिंदे सरकारने घेतला. मात्र त्याचवेळी त्यांनी ग्रामीण भागातील छोट्या शाळांमध्ये दहा हजार रुपये पगारावर निवृत्त शिक्षकांची भरती करण्याचा एक अजब निर्णय घेतला. सत्तर वर्षांपर्यंतच्या शिक्षकांना यात संधी देण्यात येणार होती. एकीकडे नोकरी लागेल म्हणून लाखो तरूण वाट पाहत असताना दुसरीकडे जुने निवृत्तीवेतन घेणाऱ्यांना पुन्हा पगार देऊन नोकरी देणे म्हणजे बेकार युवकांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे होते. शाळांमध्येच नव्हे तर राज्य सरकारातही ७५ हजार कर्मचाऱ्यांची भरती करण्याच्या मोठमोठ्या घोषणा अर्थसंकल्पी अधिवेशनाच्या वेळी शिंदे व फडणवीसांनी केल्या होत्या. पण आजतागायत ती भरती झालेली नाही. तलाठी वगैरेंची भरती रेंगाळली आहे. पोलिसांमध्ये कंत्राटी भरती करून त्याचे समर्थन केले जात आहे. सरकारी खात्यांमध्ये गरजेनुसार कंत्राटी कामगार ठेवायला खालच्या अधिकाऱ्यांना परवानगी दिली गेली आहे. आणि याबाबत कोणी जाब विचारण्याचा प्रयत्न केला तर केसरकरांसारखे मंत्री त्यांना गप्प बसवत आहेत. हे सरकार सामान्यांचे सरकार आहे असे एकनाथ शिंदे सतत म्हणत असतात. पण प्रत्यक्षात हे जनतेला धमक्या देणाऱ्यांचे सरकार आहे असाच अनुभव अधिक येऊ लागले आहेत.

विचार

आजार आहेत आणि उपायही

एक डिसेंबरला जागतिक एड्स दिन पाळला जातो. यायोगे एड्स सारख्या जीवघेण्या आजाराप्रती जागृती निर्माण करण्याचे काम सातत्याने होत असले तरी अजूनही बरेच काम होणे गरजेचे आहे. दुसरीकडे थंडीचा काळ सुरू होत आहे. या काळात देशभर अस्थमाग्रस्त रुग्णांची संख्या वाढताना दिसते. वाढत्या प्रदूषणामुळे आता ही समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे याविषयीदेखील सविस्तर माहिती घ्यायला हवी.

डॉ. दिलीप शिरसाठ

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशातल्या आरोग्यसमस्यांचा गंभीर प्रश्न सर्वज्ञात आणि सर्वश्रुत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकड्या आरोग्यसेवा आणि आरोग्याप्रती दुर्लक्ष करण्याची समाजाची मानसिकता या दोन कारणांमुळे हा देश नानाविध आजारांचे आश्रयस्थान बनत आहे, यात शंका नाही. दिवसेंदिवस हा प्रश्न उग्र रुप धारण करत आहे. त्यामुळेच दरवर्षी गंभीर आजारांप्रती जागृती निर्माण करण्यासाठी ठराविक दिवसांचे औचित्य साधले जाते. या पार्श्वभूमीवर एक डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक एड्स दिनाचे महत्व खूप मोठे आहे.

गेली अनेक वर्षी एड्सप्रती जागरुकता निर्माण करण्याचे काम होत आहे. या जीवघेण्या आजारामुळे केवळ बाधित व्यक्तीच नव्हे तर संसर्गाने जोडीदारही या आजाराला बळी पडू शकतो. परिणामस्वरुप संपूर्ण कुटुंबाला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो, हे आणि यासारखे अन्य धोके लोकांसमोर आणले जात आहेत. मात्र इतक्या वर्षांच्या प्रयत्नांनंतरही जनसामान्यांना या दाहक व्याधीचे पुरेसे ज्ञान मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच अजूनही बरेच काम बाकी आहे, असे यंदाच्या या दिनाच्या निमित्ताने म्हणावे लागेल. एड्सग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता याला कलियुगातील भस्मासूर म्हटल्यास वावगे ठरु नये. वास्तविक, एड्सपासून बचाव करण्यासाठी गर्भनिरोधके उपलब्ध असूनही जनजागरणाच्या अभावामुळे या सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर होत नाही. याबाबत देशातील तरुण पिढीशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. तसे प्रयत्न शासन आणि काही स्वयंसेवी संघटनांमार्फत केले जात आहेत. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे एचआयव्ही बाधित व्यक्ती साध्या आजारांनाही बळी पडते. शरीरातील प्रतिकार यंत्रणा मोडकळीला आणणाऱ्या या विषाणूंचा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश होण्याचे चार मार्ग आहेत. एक म्हणजे असुरक्षित शरीरसंबंध. दुसरा एचआयव्हीबाधित मातेकडून गर्भाला लागण होणे. तिसरा एचआयव्हीबाधीत व्यक्तीने वापरलेल्या सुईचा निर्जंतूक न करता पुनर्वापर आणि चौथा अपघातग्रस्त अथवा आजारी रुग्णावर शस्त्रक्रिया करताना एचआयव्हीचे विषाणू असणाऱ्या रक्ताचा पुरवठा होणे. या चार मार्गांनी एचआयव्हीचा प्रसार होतो.

एचआयव्हीची बाधा झाल्यानंतर तीन ते सहा महिन्यात रुग्णांमध्ये तीव्र ताप येणे, विशेष कारण नसताना वजनात सात ते आठ किलोची घट होणे, सातत्याने जुलाब होणे, सांधेदुखी, डोकेदुखी, थकवा, गळ्यावर अथवा काखेत गाठी येणे, तोंडाच्या आतल्या भागात फोड आढळणे, टीबी, मेनींजायटिस, न्यूमोनिया, रेटीनायटिस, हर्पिस हे विकार उद्भवणे, रात्रीच्या वेळी दरदरून घाम फुटणे आणि पोटदुखी, उलट्या होणे अशी लक्षणे आढळतात. त्यामुळेच यासारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याची सजगता वाढणे गरजेचे आहे. खेरीज भारतामध्ये असुरक्षित शरीरसंबंधांमुळे एचआयव्हीचा प्रसार होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. एचआयव्ही बाधित व्यक्तीसाठी वापरलेल्या सुयांचा वापर निरोगी व्यक्तीच्या उपचारात केल्यास एचआयव्हीचा प्रसार होतो. त्यामुळे कोणतेही उपचार घेताना रुग्णाने नव्या सुईच्या वापरासाठी आग्रह धरायला हवा. अमली पदार्थ शिरेवाटे घेणारे व्यसनाधिन तरुणही एचआयव्हीच्या प्रसाराला बळी पडतात. हेरॉईन अथवा गर्दसारखे अमली पदार्थ शिरेवाटे घेण्याची पद्धत सध्या रूढ आहे. हे व्यसनाधिन तरुण एकमेकांच्या सुयांचा वापर करतात. असे करताना त्यांना सुया निर्जुंतूक करून घेणे शक्य असतेच असे नाही. त्यामुळे बरेचदा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा पुनर्वापर होऊन एचआयव्हीचा प्रसार होतो.

विचारात घेण्याजोगा आणखी एक मुद्दा म्हणजे रक्तदान करताना अथवा रक्त स्वीकारण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी. एचआयव्ही बाधित व्यक्तीचे गाढ चुंबन घेतल्यानेही एड्सचा प्रसार होतो. विशेषतः एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या अथवा तिचे चुंबन घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडात जखमा असतील तर निश्चितच असा प्रसार होतो. दारुसारख्या अमली पदार्थांचे सेवन केल्यानंतर अनेकांना लैंगिक क्रियेत सहभागी व्हावेसे वाटते. अशा वेळी ते कंडोमचा वापर करतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे दारूचे व्यसन अप्रत्यक्षपणे एचआयव्हीच्या प्रसाराला कारणीभूत ठरते. असे असले तरी एड्सबाधीत व्यक्तीला स्पर्श केल्याने, तिचे मलमूत्र हाताळल्याने, या व्यक्तीसोबत एकाच ताटात जेवल्याने, तिचे कपडे वापरल्याने अथवा सोबत वास्तव्य केल्याने या रोगाची लागण होत नाही. एचआयव्हीची बाधा आणि प्रतिबंध यासंबंधी योग्य वेळी माहिती न मिळाल्याने काही व्यक्तींना एचआयव्हीच्या बाधेला बळी पडावे लागले आहे.

रोग आणि चर्चा करत असताना वाढत्या थंडीतील काही आजारांविषयी देखील सजग होणे गरजेचे आहे. सध्याचा काळ ऋतूबदलाचा आहे. वातावरणातील बदलामुळे या काळात अस्थम्याच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. या काळात अस्थम्याचा त्रास जाणवण्याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना श्वसनसंस्थेची ताकद कमी पडणे अथवा काही अडचणी जाणवणे. श्वसनलिका संवेदनशील असणाऱ्या रुग्णांना या दिवसात हा त्रास सोसावा लागतो. संसर्गामुळे संवेदनशील श्वसनलिका आकुंचन पावतात आणि अस्थम्याची लक्षणे जाणवायला लागतात. थंडी वाढू लागल्यानंतर वातावरणात परागकणांचे प्रमाणही वाढते. या दिवसात गवतफुलांचे प्रमाणही खूप जास्त असते. त्यामुळेच याची ॲलर्जी असणाऱ्यांना लगेच त्रास होण्यास सुरूवात होते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या काळात जमीन थंड राहते. साहजिकच गारव्यामुळे जमिनीलगत धुक्याची दुलई पसरते. ही बाबही अस्थम्याला कारक ठरते. खेरीज थंडीत हवेमध्ये अनेक दुषित कणांचा संचार असतो. प्रदुषणयुक्त वातावरणात असे घातक कण हवेत तरंगत राहतात. थंडीमध्ये पसरलेल्या धुक्यात हे कण अडकून राहतात आणि त्यांची बाधा होऊन श्वसनलिका प्रभावित होते.

या समस्येचे आणखी एक कारण म्हणजे एरवी व्यायामाला अनुत्सुक असणारे लोकही थंडीच्या आल्हाददायक वातावरणात व्यायामासाठी बाहेर पडतात. मात्र त्यांच्या शरीराला व्यायामाची सवय नसते. त्यात वातावरणातील बदलाचा परिणाम होतो आणि व्यायामामुळे येणारा अस्थमा बळावतो. वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना अस्थम्याचा त्रास वेगवेगळ्या प्रकारे जाणवतो. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे शरीर विकसित होत असतानाच अस्थमा जडतो. म्हणजेच वृद्धावस्थेत अस्थमा मागे लागत नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. लहान मुलांना अस्थम्याचा जास्त धोका असतो. त्यांना मोठ्या माणसांसारखा दम लागत नाही, मात्र ती सतत खोकतात. सतत खोकला येणे हे अस्थम्याचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. मोठ्या माणसांना दम लागणे, छातीतून आवाज येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, श्वास अपुरा पडणे आदी लक्षणे जाणवतात. त्यातही पहाटेच्या सुमारास खोकल्याची तीव्रता वाढते.

एकंदरीतच अस्थमा हा त्रासदायक आजार असला तरी सध्या यावर अत्यंत परिणामकारक औषधोपचार उपलब्ध आहेत. यात श्वासावाटे घेता येणारी औषधे अधिक परिणामकारक सिद्ध होतात. औषधांचा इन्हेल्ड डोस कमी लागतो. म्हणजेच तोंडाने दोन मिली औषध पोटात जात असेल तर श्वासावाटे दिल्या जाणाऱ्या औषधाचा २०० मायक्रोग्राम डोस पुरेसा असतो. याचे कारण औषध नेमकी गरज आहे तिथे पोहोचते. मात्र दुर्दैवाने आपल्याकडे श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या म्हणजेच इन्हेल्ड औषधांप्रती हवी तेवढी जागृती झालेली नाही. आपल्याकडे आजही औषधे घेण्याची योग्य पद्धत अवलंबली जात नाही. अशा प्रकारे घेतल्या जाणाऱ्या इन्हेलर्सची सवय लागू शकते असाही एक गैरसमज आढळतो. तो दूर करणे गरजेचे आहे. तोंडावाटे अनावश्यक प्रमाणात औषध पोटात जाते आणि काही परिणाम दाखवते.

याचाच एक भाग म्हणून अशी औषधे घेतल्यानंतर हात थरथरणे, शरीरात कंप जाणवणे, अस्थिरता अथवा बेचैनी जाणवणे आदी त्रास सोसावा लागतो. मात्र श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या औषधांमुळे असा कुठलाही त्रास जाणवत नाही. या औषधांमुळे अस्थम्यावर लवकर नियंत्रण ठेवणे शक्य होते. थंडीच्या सुरूवातीच्या काळातच आपण या सगळ्याची माहिती घेणे गरजेचे आहे. त्रास वा लक्षणांकडे लक्ष ठेवणे, गरज वाटताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे, औषधांचा पूर्ण डोस घेणे आणि आवश्यक ती पथ्ये पाळणे या नियमांचे पालन केल्यास अस्थमा रुग्ण या आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेऊ शकतात.

आजकाल

मोठ्या कंपन्या छोट्या कंपन्यांना खातात त्याची गोष्ट

संजीव चांदोरकर

आमच्या कॉलनीतील सुब्रह्मण्यम वहिनी माझ्या बायकोला सांगत होत्या, ''आपल्या त्या दुकानात एम टीआर ची नवीन प्रॉडक्ट रेंज आलीय. बेसन लाडू, नारळ बर्फी, माहीम हलवा; तुम्हा मराठी लोकांना नक्की आवडेल. आणि चपात्या, मलबार पराठा पण एमटीआर ने लाँच केला आहे.''

सुब्रम्हण्यम वाहिनी अनेक वर्षे एमटीआरच्या ब्रॅण्डशी एकदम लॉयल हे अनेक वर्षाच्या सहवासामुळे मला माहित होते. त्या एकदम खुश दिसत होत्या. आपल्या आवडत्या ब्रँडचे आता विविध पदार्थ मिळणार म्हणून

हा ब्रँड आपल्याला काही नवीन नाही. त्यांच्या सुक्या चटण्या वगैरे आम्ही अनेक वर्षे घेतो. छान असतात त्यांचे रेडी टू इट पॅकेजेस.

बंगलोर मध्ये १९२४ सालात या नावाने छोटे रेस्टॉरंट सुरु झाले. आता जवळपास १०० वर्षांनी त्याचा वटवृक्ष झाला आहे. सकाळच्या न्याहारीत खायले जाणारे पदार्थ शेवया, दालफ्राय अशी त्यांची बरीच रेंज आहे.

आणि आता त्या रेंजमध्ये खूप मोठी विविधता आणली गेली आहे; काय झाले अचानक? सुब्रम्हण्यम वहिनींना माहित असायची काही गरज नव्हती. पण राजकीय अर्थव्यवस्थेच्या विद्यार्थ्याला असली पाहिजे. म्हणून शोध घेतला. बातम्या ट्रॅक केल्या.

ज्याला आपण बंगलोर बेस्ड कंपनी म्हणतो ती खरे तर ओस्लो बेस्ड नॉर्वेजियन कंपनी आहे. एमटीआर हा ब्रँड आहे. तो ओर्काला या नॉर्वेजियन कंपनीने २००७ मध्येच विकत घेतला आहे.

जे भारतीय परदेशात राहतात आणि जे एनआरआय भारतीय पदार्थ मिस करतात त्यांच्यासाठी या नॉरएवेजीयन कंपनीने ४२ देशात आपली आउटलेट्स काढली आहेत. भारतात आणि परदेशात एमटीआर ब्रॅण्डचा १२०० कोटींची विक्री आहे ऑरकाला कंपनीने २०२० मध्ये केरळची इस्टर्न कॉंडिमेंट्स हि भारतीय मसाले बनवणारी कंपनी विकत घेतली. मध्यपूर्वेतील मल्याळी आणि दाक्षिणात्य हे त्यांचे ग्राहक आहेत; त्याची विक्री १५० कोटींची आहे

आता अधिक भांडवल घालून ऑरकाला प्रॉडक्ट रेंजमध्ये विविधता आणत आहे; पुढच्या काही वर्षात विक्री दुप्पट करणार आहे; आणि हि सगळी माहिती सुब्रमण्यम वहिनींना नव्हती, म्हणजे ग्राहकाला माहिती असण्याची गरज नसते

हि पोस्ट एमटीआर आणि ओरॅकला वर नाही; ते निमित्त आहे आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेत ग्राहक ब्रँड लक्षात ठेवून वस्तुमाल खरेदी करतात ; तो वस्तुमाल कोणती कंपनी बनवते, त्याचे मालक कोण, मालकी बदलली का, त्याचे काही पार्टस परदेशात बनतात का भारतात, याचे ग्राहक म्हणून आपल्याला काहीही देणे घेणे नसते. ब्रँड जी गुणवत्तेसाठी प्रतीक आहे, आणि किंमत, आणि पैसे मोजल्यावर व्हॅल्यू फॉर मनी मिळतेय का हेच आपले निकष असतात. आज देखील आपण ज्या ब्रॅण्डना भारतीय म्हणतो, जे काही दशके बाजारात आहेत, घरगुती झाले आहेत, ज्या कंपन्या आपण भारतीय म्हणतो, ज्या स्वान्त्र्याआधीआपसून कार्यरत आहेत, त्यांची आजची मालकी किती भारतीय आणि किती परकीय हे आपल्याला माहित नसेल. हे फक्त खाण्याच्या पदार्थाच्या बाबत नाही; ग्राहकपयोगी वस्तू, सिमेंट, कपडे, दुचाकी, रिटेल, बँका, विमा कंपन्या आपण ग्रहण करत असलेल्या अनेकानेक वस्तूच्या बाबत हे लागू आहे. आणि वर हे स्टॅटिक नाही. दोन चार वर्षांनी त्यात आमूलाग्र बदल झालेले असू शकतात. यात दुसरा अँगल आहे एम एसएमई आणि मोठ्या कॉर्पोरेट्स मधील रस्सीखेचीचा. कॉर्पोरेटकडे काहीतरी ग्रेट व्यवस्थापन असते, तेथे माणसे १२-१४ तास काम करतात हे कोर्पोरेटच्या इमेज बिल्डिंग साठी पसरलेल्या गोष्टी आहेत. कॉर्पोरेटची ताकद त्याच्या डीप पॉकेट्स/जोखीम क्षमतेमधून येते. जी आज शासन सोडले तर कोणत्याही इकॉनॉमिक एजन्सीकडे नाही. मोठ्या कंपन्या छोट्या कंपन्यांना खाणार. छोट्या कंपन्यांचे लोकप्रिय ब्रॅण्ड्स विकत घेणार. जमीन/प्लांट तुमच्याकडे ठेवा म्हणून सांगणार. यातून मक्तेदारीकरण, बहुराष्ट्रीयीकरण वाढत जाणार आहे. हे सगळे करण्यासाठी लागणारे भांडवल वित्त भांडवल पुरवते. प्रायव्हेट इक्विटी, निरनिराळे फंड्स, कर्जे देणाऱ्या बँका, भांडवली बाजारातील पब्लिक इश्यू हजारो कोटी रुपये ओतत आहेत. म्हणून मक्तेदार भांडवल आणि वित्त भांडवल सख्खे भाऊ मानले जातात; वस्तुमाल बनवण्यास लागणारी यंत्रसामुग्री, प्लांट आपल्या जागी, ब्रँड आपल्या जागी, मालकी जी शेअर्स मधून मोजली जाते ती पत्त्याचा कॅट पिसावा तशी पिसली जात असते. जागतिकीकरणाचा हा गाभा आहे.

लोकसंसद

मराठी भाषेची कुचंबणा अजून किती काळ

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील सर्व दुकाने आणि आस्थापनांवर मराठी भाषेत, देवनागरी लिपीत ठळक नामफलक लावण्यासाठी प्रशासन कारवाई करत असतानाच काही राजकीय पक्षही यासाठी पुढे सरसावले आहेत. खरं तर जी गोष्ट विनासायास व्हायला हवी त्यासाठी कारवाईचा बडगा उगारावा लागतो हेच दुर्दैवी आहे. दुकानावरील मराठी पाट्यांचा विषय असो किंवा शालेय शिक्षणात मराठी भाषा शिकविण्याचा विषय असो, प्रत्येकवेळी परप्रांतातून आलेल्या इतर भाषिकांकडून अन्याय झाल्याच्या नावाखाली मराठी भाषेला न्यायालयात खेचले जाते. न्यायालयाने तंबी दिल्यानंतरही न्यायालयाचे आदेश धाब्यावर बसवले जातात. या पार्श्वभूमीवर, प्रामुख्याने दोन गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे काही वर्षांपूर्वी चेन्नईच्या टी. नगर भागात बिग बाजार या मॉलमध्ये खरेदीसाठी गेलो असता या मॉलच्या दर्शनी इमारतीवर तामिळ भाषेत मोठ्या अक्षरात बिग बाजार लिहिलेले दिसले आणि त्याखाली इंग्रजीत लिहिले होते. दुसरी गोष्ट म्हणजे अलीकडेच आपल्या देशात पार पडलेल्या विश्वचषक सामन्यांच्यावेळी सामना सुरु होण्यापूर्वी दोन संघांच्या देशांचे राष्ट्रगीत म्हटले जायचे. त्याची उद्घोषणा स्टेडियममध्ये प्रथम इंग्रजीत आणि नंतर स्थानिक भाषेमध्ये (उदाहरणार्थ बंगळुरू येथे कन्नड तर चेन्नई येथे तमिळमध्ये) केली जायची. अपवाद फक्त मुंबईचा. वानखेडे स्टेडियममध्ये उद्घोषणा प्रथम इंग्रजीत आणि नंतर मराठीला डावलून हिंदीमध्ये केली गेली. मराठी भाषेची कुचंबणा अशा प्रकारे अजून किती काळ चालणार हा खरा प्रश्न आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

व्हायरल

राष्ट्रगीत ओमानचे आणि भारताचे

मस्कत मधल्या शाळेत 'बिस्मिल्लाह-हिर्रहमा-निर्रहीम' ने धीरगंभीर सुरुवात होई, बालवाडीतल्या पोराचीही चुळबुळ थांबे. मग 'हादिथ' आणि त्यांचे राष्ट्रगीत होई. मला आजसुद्धा अगदी थेटरातही आपले राष्ट्रगीत म्हणायला आवडते. कारण तेवढ्या सेकंदात आपल्या देशाला मस्त फेरी मारून होते. पण आज आठवण वेगळी आहे.

ओमानचा होता. सगळी शाळा सजली होती. मुलेमुली त्यांच्या पारंपरिक वेषात होती. सगळे सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. वर्गावर्गात खाऊ वाटप झाले. मनसोक्त सेल्फीसेशन झाले. आपापली पोरे वर्गात घेऊन वर्गशिक्षकलोक बेलची वाट बघत, गप्पा टप्पा करत बसलो होतो. त्या थोरल्या वर्गातल्या एकाने मला विचारले,

'टिचर, तुम्हाला आमचा देश आवडतो?'

'हो तर!'

'मग तुम्ही आमचे राष्ट्रगीत का म्हणत नाही?'

मी एकदम सावध झाले. कारण कुणाचा, कसला अभिमान कुठे, कुणाला, कसा धारेवर धरायला लावेल, ते सांगता येत नाही. तो तर बोलून चालून अकरावीचा आडनिड्या वयाचा वर्ग! आम्ही सगळे भारतीय शिक्षक खरेच इतकी वर्षे दररोज त्यांचे राष्ट्रगीत ऐकायचो, त्यातले 'आयी वतन आयी वतन' एवढेच काय ते कळायचे. बाकी गीतातले अरबी, आम्ही अरबी समुद्राला वाहिलेले असे. क्षणभर फार तीव्रतेने वाटले, आपण मुलांच्या, गुगलच्या मदतीने पाठ करायला हरकत नव्हती. किंवा फोनमध्ये बघूनसुद्धा म्हणायला हरकत नव्हती. पण कधी मनात आलेच नाही. त्यांच्या राष्ट्रगीताच्या वेळी मला भारतातल्या शाळा, तिथल्या प्रार्थना आठवत. मी हसून त्यांना खरे तेच सांगितले, 'तुम्ही तुमचे राष्ट्रगीत म्हणता, तेव्हा मला माझे राष्ट्रगीत आठवते. मला माझ्या देशाची आठवण येते. त्यामुळे तुमचे म्हणायचे राहूनच गेले! शिवाय अरबी येत नाही ती नाहीच!'

प्रामाणिक उत्तरे पोहोचतात. वर्ग जितका कान टवकारून ऐकत होता, तितका एकदम म्हणाला, 'टिचर, ओके, नो प्रॉब्लेम! तुम्ही तुमचे राष्ट्रगीत म्हणून दाखवा आम्हाला!' मला एकदम 'भलतेच काय' असे वाटले, पण वाटले, 'बऱ्याच वर्षात आपण मोठ्याने आपले राष्ट्रगीतच म्हटले नाही, चला म्हणू या..' त्यांना म्हणाले, 'पण माझे राष्ट्रगीत म्हणताना, तुम्हाला नीट 'सावधान'मध्ये उभं राहायला लागेल...' 'वल्ला टिचर, व्हाय नॉट?' 'अटेन्शन अटेन्शन' म्हणत एका नेत्याने सगळ्यांना ''अल हिंद' चे राष्ट्रगीत ऐकायला तयारीत रहा,' असे आनंदाने ओरडून सांगितले. मग मी आपली राष्ट्रगीत गाता गाता, भारतात दहा फेऱ्या मारल्या, शेवटी 'जय हे जय हे' च्या वेळेस घरची आठवण जास्तच आली. राष्ट्रगीत संपले, क्षणभर शांतता आणि एकदम टाळ्यांचा कडकडाट! मुले 'मुमताज' म्हणाली. एकाने विचारले, 'तुमची भाषा का?' मी क्षणभर विचार करून म्हणाले, 'हो'. आपल्यातल्या भाषांचे कडबोळे त्यांना सांगत बसणे म्हणजे पुढच्या शंभर प्रश्नांना उत्तरे द्यायची तयारी ठेवणे! त्यानंतर जेव्हाही थोरल्या वर्गाला 'अल हिंदचे' राष्ट्रगीत ऐकायची हुक्की यायची तेव्हा माझ्यापाशी हट्ट धरलेला असे. अर्थातच, तो मी आनंदाने पूर्ण केलेला असे. मुलांना शेवटचे 'जय हे जय हे' खूप आवडायचे. त्यांच्या ला आपले राष्ट्रगीत म्हणून त्यांचा 'राष्ट्रीय दिवस' साजरा केल्याची 'जमिल' आठवण आज तीव्रतेने आली... १८ नोव्हेंबर. ओमानचा. स्वच्छ, सुंदर समुद्र किनारे लाभलेल्या त्या शांत देशाला, आणि भारतीय शिक्षकांवर अतोनात विश्वास असलेल्या ओमानी समाजाला शुभेच्छा.

शिवकन्या शशी

प्रेरणा

मासा

एका राजाने एका सूफी फकिराला एक सुवर्णपात्र भेट दिलं. त्या सुवर्णपात्रात एक मूल्यवान शोभेचा मासा पोहत होता.

फकिराला तो मासा पाहून दया आली. पात्र सुवर्णाचं असलं म्हणून काय झालं. त्यातही मासा बंदिवानच होता. तलावाची, नदीची, समुद्राची मुक्तता त्या पात्रात नव्हती.

फकिराने माशाला स्वतंत्र करण्याचा निर्धार केला. तो ते पात्र घेऊन तलावाकाठी गेला. त्या माशाला तलावात सोडून दिलं. मग त्याने त्या पात्राकडे पाहिलं. सोन्याचं पात्र आता माशाचा तुरुंग उरलं नसलं तरी त्याच्या मूल्यामुळे आपल्यासाठी आसक्तीचा तुरुंग बनेल, हे ओळखून त्याने ते पात्रही त्या तलावात भिरकावून दिलं.

दुसऱ्या दिवशी आपण स्वतंत्र केलेला चमचमता मासा त्या स्वातंत्र्याचा कसा उपभोग घेतो आहे, हे पाहायला फकीर तलावाकाठी गेला

मासा तलावात फेकलेल्या त्या सुवर्णपात्रात पुन्हा जाऊन बसला होता. त्यातच 'मुक्त' विहरत होता.

ओशो

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ डिसेंबर

१) श्री. धैर्यशील दादासाहेब डफळे
अलिबाग, १-१२-१९४५
२) श्री. राजाराम मोतीराम डबरी
नागडोंगरी, अलिबाग, १-१२-१९५१
३) श्री. प्रकाश देवीदास सराफ
अलिबाग, १-१२-१९५०
४) श्री. केशव धाकू पाटील
थळ, अलिबाग, १-१२-१९५१
५) श्रीम. शुभांगी दिलीप शिंदे
अलिबाग, १-१२-१९५४
६) श्री. जयवंत वामन चेवले
अलिबाग, १-१२-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



आरिझ शेख, वाढदिवस, अलिबाग

सुनिता आनंद जाधव, वाढदिवस अलिबाग

तहसीलदार शिंदेंचे शेतकऱ्यांना आवाहन

सलोखा योजनेचा लाभ घ्यावा

। कोर्लई । वार्ताहर ।

शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपापसातील वाद मिटवण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी सलोखा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना ते म्हणाले की, एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्यांच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र रु.१००० आणि नोंदणी फी १००० रुपये आकारण्याबाबत सवलत देण्याची सलोखा योजना राबविण्यास शासनाने ३ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली असून, तालुक्यातील शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

या योजनेंतर्गत गावाचे तलाठी अथवा तहसील कार्यालयात साध्या कागदावर घेणार देणार यांनी एकत्रितपणे अर्ज करावा. अर्जानुसार तलाठी व मंडळ अधिकारी १५ दिवसांच्या आत स्थळ पाहणीसाठी येतील. स्थळ पाहणीत अदलाबदल होणाऱ्या शेताच्या चतुःसीमाधारक यांच्याशी १२ वर्षांपासून ताब्याबाबत चर्चा करून सत्य असल्यास तसा पंचनामा करतील, १२ वर्षांपासून ताबा असल्याबाबतचा तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या दोघांच्या स्वाक्षरी असलेला पंचनामा जावक क्रमांकासह घेणार देणार यांना देण्यात येईल. या पंचनाम्याची प्रत जोडून तालुक्याचे दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये शेतकरी प्रत्येकी १००० नोंदणी फी व १००० मुद्रांक फी भरून जमिनीच्या आदलाबदलीचा दस्त तयार करतील. दस्त नोंदणीची छायांकित प्रत तलाठी कार्यालयात दाखल करून फेरफार करून शेतकऱ्याला नवीन सातबारा उतारा मिळेल, असेही श्री. शिंदे यांनी सांगितले आहे.

तरी समाजातील शेतजमीन मालकी हक्काबाबत होणारे वाद कमी करण्यासाठी सलोखा योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार श्री. शिंदे यांनी केले आहे.

कोणाला मिळणार फायदा

या योजनेसाठी परस्परांच्या जमिनीवरती कमीत कमी मागील १२ वर्षे ताबा असायला हवा, अदलाबदल करण्यासाठी दोघा शेतकऱ्यांची संमती पाहिजे, दोघांपैकी एक सहमत नसेल तर योजनेचा फायदा घेता येणार नाही तसेच शासन निर्णयाच्या दिनांकपासून दोन वर्षांपर्यंत ही योजना लागू राहील, केवळ शेती जमिनीचे अदलाबदल करण्यात येईल, अकृषिक प्लॉट, वाणिज्य, क्षेत्र यासाठी ही योजना लागू नाही. अदलाबदल होणारे क्षेत्रांमध्ये फरक असेल (उदाहरणार्थ द्यायचे क्षेत्र कमी व घ्यायचे क्षेत्र जास्त) तरीही योजनेचा फायदा घेता येईल, जमिनीचे क्षेत्र कितीही असो, बागायत फळबाग हलकी मध्यम भारी जमीन असली तरी केवळ आणि केवळ प्रत्येक वस्ता मागे फक्त १००० एवढाच मुद्रांक शुल्क व १००० नोंदणी फी आकारली जाईल.

मराठी पाट्यांसाठी पालिकेचा पुढाकार

। पनवेल । वार्ताहर ।

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारणा अधिनियम २०२२ मधील कलम ३६ ङ्नकफ्नुसार सर्व दुकाने, संस्था, वाणिज्य आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची प्रत्येक आस्थापनेवर देवनागरी लिपीतील नामफलक असणे बंधनकारक आहे. त्यामुळे

पनवेल महापालिकेने कार्यक्षेत्रातील खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल चारही प्रभागांमधील जवळपास १,१६३ दुकाने तसेच आस्थापनांवर नोटीसा बजावल्या आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रातील अनेक दुकाने व आस्थापनांवरील नामफलक फक्त इंग्रजीत व अन्य भाषेत आहेत. काही फलकांवर नावे मराठी भाषेत लिहिलेली जरी असली तरीही ती औपचारिकता म्हणून कोपऱ्यात लहान अक्षरात लिहिलेली आहेत. नियमाप्रमाणे दुकाने किंवा आस्थापनांवरील नामफलक हे ठळक मराठी (देवनागरी) लिपीत तर असावाच त्याचप्रमाणे इतर कोणत्याही भाषेपेक्षा लहान नसावा, असे नमूद आहे. त्यामुळे दुकाने व आस्थापनांवर मराठी पाट्या लावण्यात टाळाटाळ करणाऱ्या दुकानांवर महापालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत कारवाईच्या नोटीसा बजावण्यात येत आहेत. याच अनुषंगाने पनवेल महापालिकेने प्रभाग अ, ब, क, ड मधील जवळपास १,१६३ दुकाने तसेच आस्थापनांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच ज्यांनी अजूनही अमराठी पाट्या बदलल्या नाहीत, त्यांचे प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे.

> अमराठी नामफलक लावणाऱ्या आस्थापनांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यानुसार बहुतांश ठिकाणी मराठीमध्ये दुकानांचा नामफलक बनवले जात आहेत. तसेच अमराठी पाट्या असलेल्या आस्थापनांचे सर्वेक्षण सुरु आहे.
> - गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका

संभे-आळंदीकडे दिंडीचे प्रस्थान

। रोहा । वार्ताहर ।

रोहे तालुक्यातील संभे येनून आळंदीकडे ताम्हिणी घाटमार्गे पायीवारी दिंडी प्रस्थान गुरुवार दि.३० नोव्हेंबर रोजी करण्यात आले. स्वा. सु. गुरूवर्य अलिबागकर महाराज यांच्या कृपात्राखाली व गोपाळ वाजे व नारायण दहिंबेकर यांच्या संकल्पनेतून सदर पायीवारी २३ वर्षाची यशस्वी परंपरा राखत चालू आहे.

या दिंडीचे पूजनाचे कार्यक्रम प्रसंगी राजेश सानप, सुरेश महाबळे, संजय सानप, ॲड. महेश घायले, विष्णू लोखंडे, सुनील महाडिक, डॉ. मंगेश सानप, रमेश सानप, मंगेश सानप, राम सावंत, गजानन भोईर, तुकाराम बांदल, अनंत सानप, पांडुरंग सानप, गणेश नलावडे, जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे, संजय संदे आदी पदाधिकारी तसेच श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा मंडळ संभे, ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे उपस्थित होते.

कुणबी समाज मंडळाचा उद्या वर्धापनदिन

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दि.२ डिसेंबर रोजी कुणबी भवन माणगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष महादेवराव बक्कम, शैलेश भोनकर, शांताराम भोरावकर, रामभाऊ टेंबे, काका नवगणे, राजराम वाढवळ यांनी केले आहे.

धुळे ते मंत्रालयापर्यंत संघर्ष पदयात्रा

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी व मल्हार कोळी या अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट जातींमधील अनेक समाजबांधवांना पात्र असताना देखील जातीचे दाखले मिळत नाहीत. १९५० पूर्वीचे पुरावे देऊन सुद्धा अनेकांची जात पडताळणी प्रकरणे अवैध ठरवली आहेत. यावर अनेक वेळा आंदोलन करून ही न्याय मिळत नसल्याने आदिवासी कोळी बांधवांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १७ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान धुळे ते मुंबई

मंत्रालयापर्यंत संघर्ष पदयात्रेचे समाज बांधवांच्यावतीने आयोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश पाटील यांच्या पुढाकाराने संघर्ष यात्रेमध्ये सहभागी झालेल्या समाजबांधवांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी कोळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील, शानाभाऊ सोनवणे, विजय शिंदे, कविता कोळी व अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.

जलसंधारण योजनेचा वापर करा

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत मांदाटणेला रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भेट दिली. यावेळी ग्रामपंचायतीने राबविलेल्या योजनाची त्यांनी पहाणी केली. ग्रामपंचायतीने लोकसहभागातून राबविलेल्या योजनाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी जलसंधारणअंतर्गत योजनाचे मार्गदर्शन करुन या योजनाचे वापर करण्यास त्यांनी सांगितले.

याप्रसंगी गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे, जिपचे माजी कृषी सभापती बबन मनवे, तालुका आरोग्य डॉ. गायकवाड, कृषी सहाय्यक देवरे, चंदू पवार, राजाराम धुमाळ, शंकर गोरीवले,

श्रीपत मनवे, अनंत पवार, प्रदिप पवार, शशिकांत धोकटे, किसन शिंदे, राजाराम दिवेकर, प्रकाश लाड, धनश्री मुंडे, नीता पवार, शेफाली लाड, शुभांगी शिगवण, मीनाक्षी मनवे, ग्रामसेवक पी. बी. ठाकरे, योगेश पाटिल आदि मान्यवर उपस्थित होते. विनयकुमार सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

आगरदांडा येथे कार्तिक पायी वारीचे आयोजन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

श्री ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त कार्तिक पायीवारीचे आयोजन मुरुड जोसराजंण येथील ज्ञानराज वारकरी मंडळींच्या वतीने करण्यात आले होते. टाळ-मृदुंगच्या तालावर वारकरी महिलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन जुनी बाजारपेठ मुरुड येथील श्री काळभैरव विठ्ठल रखुमाई मंदिराजवळ पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी डॉ. विश्वास चव्हाण, वृषाली चव्हाण, प्रकाश चव्हाण, दिपक राजपुरकर, अच्युत चव्हाण, रुपेश जामकर, प्रभात नाईक, दिपाली जामकर, वसंत कोलवणकर, अविनाश कोतवाल, दिलीप जामकर, आदित्य वाडकर, विजय म्हसळकर, अनुराधा चव्हाण, छाया अत्रे, शैला काते, संतोषी चव्हाण, कामिनी अत्रे आदी उपस्थित होते.

सायरा पठाण यांची सेवापूर्ती

। सुतारवाडी । वार्ताहर ।

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाडच्या शिक्षिका सायरा शेख पठाण या २९ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांची एकूण ३९ वर्षे सेवा होऊन त्या सेवानिवृत्त झाल्या. हिंदी भाषेवर विशेष प्रभुत्व असलेल्या शेख यांनी गेल्या ३९ वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक विद्यार्थी घडविले. त्यांच्या सेवापूर्तीच्या कार्यक्रमास राजेंद्र पालवे, सुखदेव तिरमले, शिरीष येरुणकर, वसंत थोरात, उदय घोसाळकर तसेच माजी शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी तसेच द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड व ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचेता तटकरे यांनी केले.

सर्वोत्तम पर्यटन गावासाठी अर्ज करण्याचे आवाहन

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

कोकणामधील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या व पर्यटनाच्यादृष्टीने महत्व असलेल्या गावांना "Best Rural Tourism Village competition २०२४ आणि Best Rural Homestay competition २०२४ साठी www.rural.tourism.gov.in या संकेत स्थळावर अर्ज सादर करण्याचे आवाहन पर्यटन विभागाने केले आहे.

कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधूदुर्ग या जिल्हयातील निसर्गा च्या सानिध्यात वसलेल्या गावांना ना मोठया प्रमाणात नामांकनासाठी संधी उपलब्ध झाली आहे. सर्व सरपंच/ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकाऱ्या आवाहन करण्यात येते की, कोकणातील गावांनी www.rural.tourism.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे. अधिक माहितीसाठी www.rural.tourism.gov.inया संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन प्रादेशिक कार्यालय कोकण विभागाचे उपसंचालक (पर्यटन) हनुमंत कृ. हेडे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

खांब ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी

दत्तात्रेय वातेरे यांची निवड

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील खांब ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दत्तात्रेय जानू वातेरे यांची निवड सरपंच कांचन मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डी. एम.पातेरे यांनी काम पाहिले. यावेळी माजी सरपंच रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, महेंद्र पोटफोडे, मनोज शिर्के, कांचन मोहिते, रंजना टवळे, योगेश धामणसे, मानसी चितळकर, सुरेखा पार्टे, चंद्रकांत जाधव, वसंत मरवडे, जनार्दन महाबळे, विश्वनाथ धामणसे, कृष्णराम धनवी, मनोज सावरकर, काशिनाथ वातेरे, जानू वातेरे, रविंद्र पार्टे, बाळू जाधव, अशोक धामणसे, अजय भोसले, मारूती सावरकर आदी उपस्थित होते.

तारकर्लीत नौदलाची चित्तथरारक प्रात्यक्षिके

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

नौदलाच्या पश्चिम कमांडच्या युद्धनौकांनी बुधवार (२९) तारकर्ली समुद्रात सायंकाळी तेजस, मिग, डॉर्निअर, चेतक आदी एअरक्राफ्ट व हेलिकॉप्टरनी चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी जिल्ह्याभरातून आलेल्या नागरिकांचे, पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फिटले. दांडी ते देवबागपर्यंतच्या किनारपट्टीवर आबालवृद्धांनी प्रात्यक्षिके पाहण्यास एकच गर्दी केली होती. त्याने संपूर्ण किनारपट्टी गजबजून गेली होती. नौदलाचा सराव पाहण्यासाठी तारकर्ली किनारी दुपारपासूनच नागरिकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. यात दांडी, वायरी भूतनाथ, तारकर्ली, देवबाग किनारपट्टी भागात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने नागरिक मुलांसह दाखल झाले होते.

प्रात्यक्षिके पाहण्यासाठी गर्दी

सायंकाळी सादर केलेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थित सर्वचजण भारावून गेले होते. प्रात्यक्षिके आपल्या मोबाईलमध्ये कैद करण्यासाठी किनारपट्टीवर सर्वांची चढाओढ सुरू होती.

नौदलाचे मरीन कमांडो पॅराशूटमधून खाली उतरताच प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. निश्चित केलेल्या पॉइंटवर एकामागोमाग एक असे आकाशातून भारताचा तिरंगा आणि नौदलाचा ध्वज फडकावत पॅराशूटद्वारे कमांडो खाली उतरले.

यानंतर आकाशात तेजस, डॉर्निअर, मिग २९ के आदी एअरक्राफ्टनी आपल्या कसरती दाखविल्या.

प्रात्यक्षिकांच्या एकापेक्षा एक सरस अशा सादरीकरणाला उपस्थितांकडून भारत माता की जय अशा घोषणा दिल्या. समुद्रात तयार केलेली शत्रूने चौकी बॉम्बच्या साहाय्याने उद्ध्वस्त करून मरीन कमांडोंनी आपली क्षमता दाखवून दिली. याचबरोबर युद्धनौकांवरून होणारे हल्ले, शत्रूच्या हल्ल्यांचा सामना करणे, समुद्री चाच्यांवर कमांडो हल्ला करणे, समुद्री बचाव, हेलिकॉप्टर कसरती अशा विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले.

प्रात्यक्षिके पाहण्यासाठी आलेल्या जिल्हाभरातील नागरिकांना दांडी, तारकर्ली, देवबाग येथील किनारपट्टीवरून पायी चालत प्रात्यक्षिके पाहण्यासाठी किनारपट्टीकडे दाखल होत होते.

सर्वसामान्यांना प्रात्यक्षिके शुक्रवारी सुध्दा पाहता येणार आहेत. त्यानंतर ही प्रात्यक्षिके ४ तारखेला पाहता येणार आहेत. त्यामुळे तारकर्ली किनारपट्टीवर जिल्ह्यातील नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

नौकांवर रोषणाई

ध्रुव, चेतक, सी किंग या हेलिकॉप्टरबरोबर तेजस, डॉर्नियर, मिग २९ के आदी लढाऊ विमानांनी आपल्या कसरती दाखविल्या. सूर्यास्तावेळी राष्ट्रगीताची धून वाजविण्यात आली. त्याचप्रमाणे सारे जहासे अच्छा हिंदोस्ता हमारा या गीताचीही धून वाजविली. त्यानंतर समुद्रात नौदलाच्या युद्ध नौकांवरील रोषणाई सुरू झाली. ही रोषणाई आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

चाईल्ड केअरतर्फे अन्नधान्य वाटप

। उरण । वार्ताहर ।

चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरणतर्फे उरण येथील इंदिरा गांधी झोपडपट्टी व वेश्वी वाडीतील शंभर जणांना अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मिलिंद खारपाटील, विठ्ठल ममताबादे, रमणीक म्हात्रे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे मनोज ठाकूर , हितिक पाटील, तुषार ठाकूर, राजेश ठाकूर, उद्धव कोळी, निवृत्ती ठाकूर, रोशन घरत, आणि विवेक कडू यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमणीक म्हात्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे संस्थापक विकास कडू यांनी केले.

संतोष आंबवणेंना मातृशोक

पनवेल : पनवेल शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी येथे राहणारे बांधकाम व्यवसायिक संतोष आंबवणे यांना मातृशोक झाला आहे. वैजयंती वसंत आंबवणे (८५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातू, नात असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार (दि. १) डिसेंबर २०२३ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे सकाळी आठ वाजता होणार आहे. तर उत्तरकार्य विधी सोमवार (४) डिसेंबर रोजी राहत्या घरी करण्यात येणार आहे. असे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

कर्जत-नेरळ रस्त्यावरील डांबरीकरण आठ दिवसात उखडले

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत-कल्याण रस्त्यावरील डांबरीकरणाचे काम करण्यात आले होते. आता मात्र आठ दिवसातच डांबर उखडल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदाराला याबाबत दंड आकारावा अशी मागणी जोर धरत आहे.

सदरचा रस्ता हा २१ किलोमीटर लांबीचा असून हा रस्ता शासनाच्या हायब्रीड तत्वावर तयार करण्यात आला आहे. २०१९ मध्ये या रस्त्याच्या अर्ध्या भागात काँक्रिटीकरण आणि अर्ध्या भागात डांबरीकरण असे नियोजन केले आहे. त्यानुसार कर्जत चारफाटापासून वडवली गावापर्यंत हा रस्ता काँक्रिटचा बनविला आहे.

- **रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे**
- **ठेकेदाराला दंड आकारण्याची नागरिकांची मागणी**

दुपदरी मार्गिका असलेला हा कर्जत-नेरळ रस्ता वडवलीपासून शेलू या रायगड जिल्हा हद्दीपर्यंत डांबरीकरणाने बनविण्यात आला आहे. रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्याबाबतचा करार सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. पुढील १० वर्षे या कराराची मुदत आहे. पावसाळा संपल्यानंतर पुन्हा रस्त्याची दुरुस्ती केली जाते.

मागील काही दिवस आधी या रस्त्यावर वडवलीपासून पुढे नेरळपर्यंत डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र सदरचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसून येत आहे. रस्त्यावरील डांबरीकरण उखडल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना वाहन चालताना त्रास होत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

वर्सोवा-विरार सागरी सेतूला विरोध

। वसई । वृत्तसंस्था ।

वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पामुळे वर्सोवा आणि विरार किनाऱ्यालगतचे कोळीवाडे आणि येथील मच्छिमार व्यवसाय कायम स्वरूपी बाधित होणार आहेत. असे असताना मच्छिमारांना, मच्छिमार संघटनांना विश्वासात न घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हा प्रकल्प राबवित असल्याचा आरोप करीत वर्सोवा मनोरी दरम्यानच्या ११ मच्छिमार संघटनांनी या सागरी सेतूला विरोध केला आहे.

सागरी सेतूचे कामच नव्हे तर सर्वेक्षणही होऊ देणार नाही असा इशारा मच्छिमार संघटनांनी एमएमआरडीएला दिला आहे. त्यामुळे हा प्रकल्प वादात अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. एमएमआरडीएकडून ४२.७५ किमीच्या वर्सोवा-विरार सागरी सेतूची उभारणी केली जाणार आहे. या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे पुनर्विलोकन करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे.

यासाठी सल्लागार नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच या दरम्यान एमएमआरडीएकडून सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार २ नोव्हेंबरला मढ गोराई पट्ट्यात सर्वेक्षणासाठी गेलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मच्छिमारांनी रोखले होते. मच्छिमारांना कोणतीही पूर्व सूचना न देता, त्यांना विश्वासात न घेता प्रकल्प राबविला जात असल्याचा आरोप करीत मच्छिमारांनी सर्वेक्षण रोखले. सध्या सर्वेक्षण बंद असून मच्छिमारांचा हा विरोध लक्षात घेता मत्स्य व्यवसाय विभाग आणि एमएमआरडीएकडून भाटी मच्छिमार संघटनेच्या सभागृहात बैठक घेण्यात आली.

यावेळी ११ मच्छिमार संघटनांनी या प्रकल्पाला विरोध दर्शविल्याची माहिती भाटी मच्छिमार सर्वोदय सहकारी सोसायटीचे अध्यक्ष राजीव भाटी यांनी दिली.

मढ, गोराई परिसरात मत्स्य व्यवसाय विभागाची कोणतीही परवानगी न घेता सर्वेक्षण करण्यात येत होते. ते सर्वेक्षण आम्ही बंद पाडले आहे. पुढे सर्वेक्षण होऊच देणार नाही. या प्रकल्पासाठी समुद्रात करण्यात येणाऱ्या कामामुळे मच्छिमारी व्यवसायला फटका बसणार आहे, बोटी नेण्या-आणण्यास अडचणी निर्माण होणार असून मत्स्य उत्पादन कमी होणार आहे. एकूणच आमच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. आम्ही बाधित होणार असताना आम्हाला विचारातही घेतले जात नाही. तेव्हा आम्ही कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प होऊ देणार नाही, असे भाटी यांनी सांगितले. हा प्रकल्प रद्द करावा या मागणीसाठी आता सर्व मच्छिमार संघटनांनी एकत्र येत रस्त्यावरची लढाई लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मोर्चे, निदर्शने अशी आंदोलने यापुढे होतील असेही त्यांनी सांगितले. याविषयी एमएमआरडीएतील संबंधित अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

नेरळ रेल्वे स्थानकातील स्कायवॉकचा पहिला खांब उभा राहिला

। नेरळ । वार्ताहर ।

मध्य रेल्वेच्या मुख्य वाहिनीवरील नेरळ रेल्वे स्थानकात स्कायवॉक बनविला जात आहे. या स्कायवॉकच्या पहिल्या खांबाची उभारणी स्थानकात करण्यात आली. फलाट एकवर हा स्कायवॉक उभारला जात आहे. त्याची एक बाजू थेट नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ असलेल्या रेल्वे पार्किंगपर्यंत राहणार आहे.

नेरळ स्थानकात कर्जत दिशेकडील फलाट एकवर मुंबईकडून येणाऱ्या उपनगरीय लोकलमधील प्रवासी उतरत असतात. तसेच या स्थानकातून माथेरान या पर्यटन स्थळाकडे मिनीट्रेन जाते. त्यामुळे जागतिक दर्जाच्या माथेरान या पर्यटन स्थळाचे प्रवेशद्वार म्हणून नेरळ रेल्वे स्थानक ओळखले जाते.

सध्या नेरळ रेल्वे स्थानक स्कायवॉकसाठी गेल्या सहा महिन्यांपासून काम सुरू आहे. या स्कायवॉकसाठी आवश्यक असलेला लोखंडी खांब उभारण्याचे काम मध्य रेल्वेकडून सुरू करण्यात आले आहे. त्यातील पहिल्या लोखंडी खांब उभारण्याचे काम मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी पूजा करून सुरु केले. यासाठी मोठ्या क्रेनची मदत घेतली जात आहे.

परिणामी मुंबई येथून उपनगरीय लोकलने येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी नेरळ स्थानकाचा मेक ओव्हर केला जात आहे. लोकांची वर्दळ या स्थानकात वाढली आहे. प्रवाशांना स्थानकाच्या बाहेर पडताना वाहनांच्या गर्दीचा त्रास होऊ नये यासाठी फलाट एकमधून बाहेर पाडण्यासाठी स्कायवॉक बनविण्याचा निर्णय विद्यमान खासदारांनी घेतला होता.

- पनवेल येथे भात खरेदी केंद्राचे उद्घाटन शेकाप नेते जे.एम.म्हात्रे यांच्याहस्ते करण्यात आले.

मॅलेट बंदरातील मच्छिमार जेट्टी विस्तारीकरणाला प्रारंभ

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भाऊचा धक्का येथील मॅलेट बंदरातील जहाजांची कोंडी सोडविण्यासाठी मुंबई बंदर प्राधिकरणाकडून हाती घेण्यात आलेल्या मच्छिमार जेट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. हे काम दोन वर्षांत अर्थात २०२५ अखेरीस पूर्ण करण्याचे बंदर प्राधिकरणाचे नियोजन आहे.

आजच्या घडीला मॅलेट बंदरातील जेट्टीवर केवळ ५० बोटी उभ्या राहतात. पण हे काम पूर्ण झाल्यास अर्थात २०२५ अखेरपासून येथे १५० बोटी उभ्या राहू शकणार आहेत. दक्षिण मुंबईतील भाऊचा धक्का येथील मॅलेट बंदरावर प्रवासी जेट्टी आणि मच्छिमारांसाठीची जेट्टी अशा दोन जेट्टी आहेत. मात्र या दोन्ही जेट्टींकडे जाण्यासाठी एकच रस्ता आहे. त्यामुळे या जेट्टीवर आणि रस्त्यावर मोठी कोंडी होते. त्यात या बंदरावरील जहाजांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. दिवसाला १३०० ते १४०० जहाज येथे येतात. मात्र सध्या बोटी उभ्या करण्याची क्षमता केवळ ५० बोटी अशी आहे. परिणामी उर्वरित बोटींना मोठी प्रतीक्षा करावी लागते. मासे हे नाशवंत असताना अनेक बोटींना मोठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने मासे खराब होत असल्याचे चित्र आहे. या सर्व बाबी लक्षात घेत बंदर प्राधिकरणाने मॅलेट बंदरावरील मच्छिमारांसाठीच्या जेट्टीच्या विस्तारीकरणाचा निर्णय घेतला आहे. तर प्रवासी जेट्टी आणि मच्छिमारांसाठीच्या जेट्टीकडे जाण्यासाठी स्वतंत्र रस्ता बांधण्याचाही निर्णय या विस्तारीकरणाअंतर्गत घेतला आहे. अशा या विस्तारीकरणाच्या कामासाठी मागील वर्षी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा अंतिम करत नुकतीच या कामाला सुरुवात करण्यात आल्याची माहिती मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष राजीव जलोटा यांनी दिली.

जेट्टी विस्तारीकरणासह इतर कामांसाठी १०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. हा निधी केंद्राकडून उपलब्ध करुन दिला जात आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीला या कामास सुरुवात झाली आहे. जेट्टीचे विस्तारीकरणाचे हे काम पूर्ण झाल्यानंतर भाऊचा धक्का, मॅलेट बंदर येथील जहाजांची कोंडी दूर होणार आहे. सध्याची जेट्टीवरील बोटी लावण्याची क्षमता ५० बोटीवरून १५० बोटी अशी होणार आहे.

कोकण पदवीधरसाठी 'मनसे' उतरणार

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविण्यासाठी राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. भाजपनंतर शिवसेनेचा शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार आणि शरद पवार गट, शिवसेना यांच्याकडून निवडणुकीसाठी तयारी केली जात आहे. यादरम्यान कोकणातून पदवीधर निवडणुकीसाठी मनसे उमेदवार देणार असल्याचे बोलले जाते. कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांच्या शर्यतीत मनसेकडून अभिजीत पानसे यांचे नाव आघाडीवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पानसे यांचा शिक्षणक्षेत्रात चांगला अभ्यास असून त्यांनी यापूर्वी शाळेतील अनेक समस्या मांडल्या आहेत. त्यांनी कोकणात पदवीधर निवडणुकीसंदर्भात कोकण, उल्हासनगर, ठाणे भागात बैठक घेतल्या आहेत. कोकण पदवीधर निवडणुकीत भाजप, ठाकरे गट आणि मनसेत लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

'ई-वॉटर टॅक्सी' नवी मुंबईकरांना वरदान

। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।

गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर मार्गावर विद्युत अर्थात 'इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी गोव्यात चार बोटींची बांधणी करण्यात येत असून त्यापैकी दोन बोटी डिसेंबरपासून सेवेत दाखल होणार आहेत. ही सेवा सुरू झाल्यास गेट ऑफ इंडिया ते बेलापूर अंतर केवळ एका तासात पार करता येईल. या प्रवासासाठी १०० ते १५० रुपये भाडे आकारले जाणार आहे.

मुंबईतील वाहतूककोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी जलवाहतुकीला चालना देण्याचा प्रयत्न मुंबई सागरी मंडळ, तसेच मुंबई बंदर प्राधिकरण करीत आहे. त्याचाच भाग म्हणून 'रो रो' सेवा आणि 'वॉटर टॅक्सी' सेवा सुरू करण्यात येत आहेत. एका खासगी कंपनीच्या माध्यमातून दीड-दोन वर्षांपूर्वी गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर, मांडवा अशी २०० प्रवासी क्षमतेची वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र प्रतिसादाअभावी ती बंद पडली होती.

- **गेट वे ते बेलापूरदरम्यान प्रवास केवळ एक तासात**
- **डिसेंबरपासून प्रारंभ; प्रवासभाडे १०० ते १५० रुपये**

असे असताना आता गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटा आणि गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर अशी विद्युत अर्थात इलेक्ट्रिक चालणारी वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रदुषणाच्या समस्येचा विचार करून हा पर्याय पुढे आणण्यात आला. त्यानुसार या सेवेसाठी दीड-दोन वर्षांपासून तयारी सुरू होती. गोव्यात चार 'ई वॉटर टॅक्सी'ची बांधणी करण्यात येत आहे. आतापर्यंत चारपैकी दोन टॅक्सीची बांधणी पूर्ण झाली असून लवकरच दोन टॅक्सी इन्फिनिटी हार्बर सर्व्हिसेस या खासगी संस्थेला चालविण्यासाठी देण्यात येणार आहेत. डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात दोन ई वॉटर टॅक्सी दाखल झाल्यानंतर गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर ही दैनंदिन जलवाहतूक सेवा सुरू होईल, असे इन्फिनिटी हार्बरचे मालक सोहेल कझानी यांनी सांगितले. तूर्तास गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर अशी सेवा सुरू करण्यात येणार आहे. मात्र भविष्यात गेट वे ऑफ इंडिया ते बेलापूर व्हाया एलिफंटा अशी सेवा सुरू करण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दिवाळीनंतर फुलले ग्रामीण मॉल

। रायगड । प्रतिनिधी ।

ग्रामीण अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहाराचे सर्वात मोठे ठिकाण आठवडा बाजार आहे. यामध्ये शेतमाल, कारागिरी, कलाकुसर, जोडव्यवसाय, पाळीव प्राणी, पक्षी, खाद्यान्न, कपडे, मसाल्याचे पदार्थ, गृहपयोगी वस्तू, पावसाळी गरजेचे साहित्य यांची खरेदी विक्री होते. त्यामुळे या आठवडा बाजारांकडे आता ग्रामीण मॉल म्हणून पहिले जात आहे.

आठवडी बाजार म्हणजे दर आठवड्याच्या एका विशिष्ट दिवशी व विशिष्ट स्थानी भरणारा बाजार होय. या ठिकाणी विक्रेते आपापला माल घेऊन येतात व विक्री करतात. ज्या ठिकाणी भरपूर दुकाने नाहीत व अशी दुकाने असणाऱ्या ठिकाणी जाणे गैरसोयीचे व आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसते, तेथे अशा प्रकारचा बाजार भरविला जातो. भारतात जास्त करून ग्रामीण भागात अजूनही अशा प्रकारची व्यवस्था आहे. अनेक शहरातही मोजक्या ठिकाणी असा बाजार भरतो. गावातील आठवडी बाजार ही गावच्या अर्थकारणासाठी महत्त्वाची बाब आहे. स्थानिक संस्था, ग्रामपंचायत अशा बाजाराची व्यवस्था करते. रायगड जिल्ह्यात आठवडा बाजाराची परंपरा आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी इतिहासकालीन आठवडा बाजार आहेत.

आठवडा बाजारात होते कोट्यवधींची उलाढाल

रायगड जिल्ह्यात तब्बल ६३ आठवडा बाजार भरतात. या बाजारांमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होत असते. दिवाळीनंतर पुन्हा एकदा ग्रामीण भागात आठवडा बाजार सुरू झाल्याने अर्थचक्राला गती मिळाली आहे. ग्रामीण भागात गावदेवतेचे पूजन केल्यावर बहुतेक ठिकाणी आठवडा बाजार सुरू केला जातो. मुख्य गावात आठवडा बाजार भरतो.

ग्रामीण भागात खालुबाजाचा सूर हरपला

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

श्रावण महिन्यातील गोपाळकाळाच नव्हे, तर गणेशोत्सव, विशेषतः ग्रामीण भागात होणाऱ्या विवाह समारंभात खालुबाजा वाजल्याशिवाय उत्सव साजरा होत नव्हता. काळाच्या ओघात आता नवीन वाद्यांना पसंती दिली जात असल्याने खालुबाजाचा सूर हरपल्याचे चित्र आहे.

ढोल, सनई आणि टिमकी या केवळ तीन वाद्यांच्या साथीने वाजंत्री विविध समारंभात रंगत आणायचे. तासंतास घाम गाळणाऱ्या वाजंत्र्यांना ग्रामीण भागात आजही तेवढाच मान मिळतो. परंतु गावागावातून बेंजो पथक निर्माण झाले, नाशिक बाजा, ढोल पथक तसेच डिजेला मागणी वाढू लागली आणि वाजंत्र्यांचा मान कमी होऊ लागला. पारंपरिक वाद्यांना मागणी कमी झाली आहे. खालुबाजा वाजविणे म्हणजे स्वतःच्या इमेजला धक्का लागत असल्याच्या समजुतीवरुन ग्रामीण भागातील तरुणांचे या कलेकड दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ही कलाच नामशेष होत आहे की काय अशी भीती वाटू लागली आहे. जुने वयोवृद्ध वाजंत्री सोडल्यास तरुण वाजंत्र्यांची वानवा ग्रामीण भागात आज सतत जाणवत आहे. ग्रामीण भागातील तरुणांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी बहुतांशी राजकारण्यांनी गावागावातील तरुण मंडळांना बेंजो सेट भेट स्वरुपात दिले आहेत. अशी वाद्य आयती मिळत असल्याने तरुण खालुबाजा सारख्या वाद्यांच्या मागे वेळ घालवत नसल्याचे चित्र आहे.

> **खालुबाजा वाजविणे तसे कष्टाचे काम आहे. मिवरणुकीत नाचणारी मंडळी व अन्य खालुबाजा बरोबर स्पर्धा लागल्यास सर्वस्व पणाला लावावे लागते. अन्य बाजांच्या तुलनेत खालुबाजाला फारसा वाव मिळत नाही. हे खरे आहे.**
>
> **– हशा ढोलके, वाजंत्री–खारीकवाडा**

> **हल्लीच्या काळात तरुण मंडळींना खालुबाजा आवडत नाही, तर त्यांना डीजे , बेंजो, ढोल पथकाच्या तालावर थिरकायला आवडते. परंतु खालुबाजा हे पारंपरिक वाद्य आहे. आमच्या वाडवडिलांकडून ही कला मिळाली आहे. कलेसाठी कला, की जीवनासाठी कला हा विचार मी तेथे करीत नाही.**
>
> **– दगडू ठाकुर, वाजंत्री–नांदगाव**

> **तरुणांनी वाजंत्र्यांची कला शिकून ती जपली पाहिजे, नाही तर काळाच्या ओघात तीचे अस्तित्वच राहणार नाही अशी भीती वाटते.**
>
> **– ऋषिकांत पाटील, वाजंत्री– मजगाव**

नोकरी लावण्याच्या आमिषाने ४४ जणांची फसवणूक प्रकरण

शैलजा दराडेंना जामीन मंजूर

। पुणे । वृत्तसंस्था ।

शिक्षण विभागात नोकरी लावण्याच्या आमिषाने ४४ जणांची तब्बल ५ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या तत्कालीन आयुक्त शैलजा रामचंद्र दराडे यांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. गुल्हाणे यांनी जामीन मंजूर केला आहे. पुराव्यात छेडछाड करू नये तसेच साक्षीदारांवर दबाव आणू नये यासह विविध अटीशर्तींसह ७५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर हा जामीन दिला आहे. शैलजा दराडे यांनी रायगड जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून काम पाहिले आहे.

उमेदवारांना शिक्षक, आरटीओ, तलाठी पदावर नोकरी लावू तसेच टीईटी उत्तीर्ण करून देवू असे आमिष दाखवत फसवणूक केल्याप्रकरणी शैलजा दराडे (रा. पाषाण) यांच्यासह त्यांचा भाऊ दादासाहेब रामचंद्र दराडे (रा. इंदापूर) यांच्यावर हडपसर पोलिस ठाण्यात फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पोपट सुखदेव सूर्यवंशी (रा. खाणजोडवाडी, आटपाडी, सांगली) यांनी फिर्याद दिली होती. त्यानंतर सात ऑगस्टला शैलजा दराडे यांना अटक झाली. दराडे यांना न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला होता. त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली होती.

शिक्षकांना कायमस्वरूपी नोकरी लावण्यासाठी दराडे या त्यांच्या भावामार्फत डी.एड. झालेल्यांकडून सुमारे १२ तर बी.एड. झालेल्यांकडून सुमारे १४ लाख रुपये घेत होत्या. या प्रकरणी त्यांना निलंबन करण्यात आले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने त्यांचा जामीन फेटाळून लावला होता.

सुंदरराव मोरे महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीर

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे संस्थापक प्रभाकर मोरे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महाड येथील जनकल्याण रक्तपेढीतर्फे शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये एकूण ३० पिशव्या रक्त संकलित करण्यात आले होते. महाड दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश हर्षदा आदमाने, शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे, उपाध्यक्ष ॲड. विनोद देशमुख यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर, उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे, आजीवन विभागाचे प्रा. डॉ. नाथिराम राठोड, कार्यालय अधीक्षक मुकुंद पंदेरकर आदी उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी जनकल्याण रक्तपेढीचे वरिष्ठ अधिकारी रवी शिंदे, संचालक प्रा. डॉ. समीर बुटाला, डॉ. पल्लवी साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.

S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

TENDER NOTICE
MEP

CONCOR invites sealed tender for the following work :-

Tender N. & Date	Ref.: SGM Dated 05/11/2023 CONCOR/IBG/SOC/MEP/2023-2024 Dt. 01/12/2023
Description of Work	Tender for hiring of MEP
Cost of Tender Document	Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST
Earnest Money Deposit	Rs. 50,000/- (Rs. Fifty Thousand Only)
Mode of Payment (Bank Details)	Draft favoring "Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd." at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch
Contract Period	1 year
Dt. of Sale of Tender Document	From 01/12/2023 TO 10/12/2023 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 10/12/2023
Tender Opening Date: 11/12/2023-11.00 a.m. at Society Office

तारीख : ०१-१२-२०२३ — **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ : पनवेल — **इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.**

INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.

S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

TENDER NOTICE
HOUSEKEEPING SERVICES

CONCOR invites sealed tender for the following work :-

Tender N. & Date	Ref.: SGM Dated 05/11/2023 CONCOR/IBG/SOC/HK/2023-2024 Dt. 01/12/2023
Description of Work	Tender for hiring of Housekeeping Services
Cost of Tender Document	Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST
Earnest Money Deposit	Rs. 1,00,000/- (Rs. One Lakh Only)
Mode of Payment (Bank Details)	Draft favoring "Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd." at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch
Contract Period	1 year
Dt. of Sale of Tender Document	From 01/12/2023 TO 10/12/2023 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 10/12/2023
Tender Opening Date: 11/12/2023-11.00 a.m. at Society Office

तारीख : ०१-१२-२०२३ — **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ : पनवेल — **इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.**

INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.

S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

TENDER NOTICE
OFFICE STAFF

CONCOR invites sealed tender for the following work :-

Tender N. & Date	Ref.: SGM Dated 05/11/2023 CONCOR/IBG/SOC/office Staff/2023-2024 Dt. 01/12/2023
Description of Work	Tender for hiring of Office Staff
Cost of Tender Document	Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST
Earnest Money Deposit	Rs. 50,000/- (Rs. Fifty Thousand Only)
Mode of Payment (Bank Details)	Draft favoring "Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd." at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch
Contract Period	1 year
Dt. of Sale of Tender Document	From 01/12/2023 TO 10/12/2023 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 10/12/2023
Tender Opening Date: 11/12/2023-11.00 a.m. at Society Office

तारीख : ०१-१२-२०२३ — **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ : पनवेल — **इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.**

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

नोटीस

प्रति,
श्री. विनीत रमेश म्हात्रे
एअर पोर्ट आथोरीटी,
S.V.P.I एअरपोर्ट,
अहमदाबाद-गुजराथ
पिन- ३८२४७५
एअरपोर्ट आथोरीटी,
गोवा इंटरनॅशनल एअरपोर्ट,
एअरपोर्ट रोड,
डाबोलीम,
गोवा-पिन ४०३८०१
'वास्तव' चौल-दादर
अधिकारी आळी, मु.पो.चौल,
अलिबाग-रायगड, पिन-४०२२०३

आमचे अशिल श्रीमती श्वेता अरविंद म्हात्रे, रा. विलेपार्ले यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे व सुचनेवरुन त्यांचे तर्फे मी ॲड. पल्लवी तुळपुळे तुम्हास नोटीस देते ती खालीलप्रमाणे.

१. तुमचा व आमच्या अशिलांचा विवाह दि. १६-०२-२००८ रोजी मौजे- भोवळे ता. अलिबाग येथे हिंदू धर्म शास्त्र रितीरिवाजाप्रमाणे झाला. सदर लग्न संमधातून तुम्हा उभयतांना कु. वेदिका नावाची मुलगी दि. २५-११-२००८ रोजी झाली.

२. त्यानंतर तुम्हा उभयतानमध्ये कौटुंबिक वाद निर्माण झाले व तुम्ही अलिबाग येथील मा. कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याचा अर्ज क्र पिटीशन एफ ०६/२०२३ दाखल केला. त्याप्रमाणे तुम्ही दोघेही कायदेशीररित्या घटस्फोट घेऊन वेगळे झाला आहात.

३. परंतु सदर अर्जात तुम्ही तुमची मुलगी कु. वेदिका हिस दरमहा पोडगी देण्याचे व नॉमिनी ठेवण्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच कु. वेदिका हिचा जो काही कायदेशीर हक्क आहे तो आजही अबाधित आहे.

४. असे असताना मौजे चौल येथील भूमापन क्र. २४१२ ही मिळकत व त्यावरील घर ग्रुप ग्रामपंचायतमध्ये नोंदणीकृत असलेले घर क्र. १०३७ ही वडिलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये कु. वेदिका हिचा कायदेशीर हक्क व हितसमंध आहे.

५. असे असताना देखील सदर मिळकत तुम्ही आमच अशिल ह्या कु. वेदिका हिच्या अज्ञान पालन करती आई असताना देखील तिची परवानगी न घेता कु. वेदिका हिचा हक्क डावलून व तिला फसवून विकत असून सर्व पैसे हडप करण्याच्या बेतात आहात.

६. कु. वेदिका हिचा वर नमूद मिळकतीमध्ये जो काही हिस्सा आहे तो तिला देणे कायद्याने बंधनकारक आहे.

७. तरी या नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर व्यवहाराबाबत आमच्या अशिलांना व त्यांच्या वकिलांना पूर्ण माहिती देण्यात यावी. व कु. वेदिका हिचा कायदेशीर हिस्सा वेदिका हिस देण्यात यावा.

८. असे करण्यास आपण कसूर केल्यास आमच्या अशिल त्यांना जो कायदेशीर सल्ला मिळेल त्याप्रमाणे तुमच्यावर योग्य ती दिवाणी स्वरुपाची कार्यवाही करतील व त्याचा व ह्या नोटीसीचा खर्च रक्कम रुपये १५,०००/- ह्याची जबाबदारी तुमच्यावर राहील.

अलिबाग
दि. ०३-११-२०२३
श्रीमती श्वेता अरविंद म्हात्रे

सही/-
ॲड. पल्लवी तुळपुळे
बी.कॉम,एल.एल.बी,एम.एम.एस,डिसीएल,
डीआयसी, मो. ९९२१५५०६७६
Email -pallavitulpule@gmail.com

सही/-
आमच्या अशिल.

तहसिलदार अलिबाग यांचे न्यायालयात

कु.का.क.७० ब दावा क्र. २१/२०२२

श्री. सुरेश हरिश्चंद्र नाईक, रा. शास्त्रीनगर,
पो. नागाव,ता.अलिबाग, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.चंपुबाई हरिश्चंद्र चोगले,
२. विजयकुमार विनायक नाईक,
३. नंदकुमार विनायक नाईक,
४. निला लक्ष्मण वैद्य,
५. आशा विष्णू पाटील, सर्व रा. नागाव, पो. नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड — सामनेवाला

मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये दावा मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	गट नं.	क्षेत्र	पो.ख.	आकार
नागाव	१३४२	०-०१-००	०-०१-३०	०.०२

अर्जदार सुरेश हरिश्चंद्र नाईक, रा. शास्त्रीनगर, नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी वरील नमूद केलेल्या भातशेती मिळकतीस कु.का.क.७० ब नुसार कुळ ठरविणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. या कामी सामनेवाला चंपुबाई हरिश्चंद्र चोगले व इतर, रा. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांना नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जाचे सुनावणीचे काम या मे. कोर्टात दि. २२-१२-२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय अलिबाग येथे सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. त्याकरीता त्यांनी या कोर्टात हजर राहून त्यांचे लेखी म्हणणे सुनावणीचे वेळी किंवा तत्पूर्वी मांडावे अन्यथा सदर दाव्याचा निर्णय गुणवत्तेवर घेण्यात येईल.

ठिकाण - अलिबाग — **सही/-**
दिनांक- ३०-११-२०२३ — **तहसीलदार अलिबाग**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता.कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

जमिन मालकांची नावे	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रु.पै.
१)पांडुरंग राजाराम कुळकर्णी	१५	७	०-१३-२०	०-१५
२)चाळसानी हर्षवर्धन प्रसाद ३)नंदकुमार अनंत हजारे	१६	१	०-०६-००	०-२५

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लीज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१-१२-२०२३

ॲड. सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१

जाहीर नोटीस

माझे अशिल रेनडान्स रिसॉर्ट प्रा.लि.चे प्रमोटर शरद वामन सावंत व सुरेश ओ अगरवाल यांनी खाली नमूद केलेल्या जमिन मिळकतीसंदर्भात शोध अहवाल व स्वामित्व हक्क दाखल्याची मागणी केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन- मौजे-अंजप, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.

भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्रफळ (हे.आर.प.)	आकार (रु.पै.)
६८/५/ब	१-५३-००	०.९४
७७/६	१-६५-००	०.६६
७७/७	०-६३-००	०.२५
७८/१	११-२०-००	५.७५
७८/२	०-२०-००	०.१
७८/५	०-६१-००	०.२५

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजून माझे अशिलांची शोध अहवाल व स्वामित्व हक्क दाखल्याची मागणी पूर्ण केली जाईल. मागावून कोणीही हरकत घेतल्यास ती माझ्यावर व माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक - ३०-११-२०२३

ॲड. उमेश आनंद भगत
(अधिवक्ता)
मु.पो.चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड, मो.नं. ९०४९४८६८०५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खाली सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत आमचे अशिल श्री. केदार अनिल नाडकर्णी, पत्ता - बी / ००१, अस्तव सोसायटी, प्लॉट नं - १२४ ए / बी, सेक्टर१२, वाशी, नवी मुंबई, ठाणे पिनकोड - ४००७०३,मोबाईल -९२२३२५९९०९ यांनी सदर स्थावर मिळकत मूळ मालकाकडून कायम खरेदी खताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका कर्जत रायगड जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती कर्जत यांचे कार्य क्षेत्रातील मा. दुय्यम निबंधक कर्जत यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे - मुगपे ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत महसूल दप्तरी वर्णन खालील प्रमाणे

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे. आर	आकार रु. पै.
४३	१/क	०.५७.७० पैकी २१गुंठे	६.७४

माझे अशील वर वर्णन केलेली स्थावर मिळकत मुळ मालक श्री. शरद उत्तम चौधरी, राहणार - ए - १० / ७०४, ७ फ्लोर, ऋतू एनक्लेव, घोडबंदर रोड,मुच्छल्ला /कॉलेजसमोर,आनंद नगर,ठाणे, पिनकोड-४००६१५यांचे कडून खरेदी खताद्वारे खरेदी करणार आहेत.,

वर नमूद मिळकती संबंधी माझे अशील व वर नमूद मूळ मालक यांच्यामध्ये समझोता करार/खरेदी विक्री करार होणार असल्याने त्या अनुषंगाने व्यवहार करण्यापूर्वी सदर नोटीस वर्तमानपत्रामध्ये देण्याचे माझ्या अशिलांनी ठरविले आहे, वर नमूद मूळ मालक श्री. शरद उत्तम चौधरी, यांनी वर उल्लेखलेली जमीन मिळकत दिनांक, २८ सप्टेम्बर,२०२२ (२८/०९/२०२२) रोजी खरेदीखताद्वारे खरेदी केलेली आहे, असे त्यांनी दिलेल्या माहिती वरून व दिलेल्या कागदपत्रावरून दिसून येत आहे.

तरी वर उल्लेखलेल्या स्थावर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, तसेच या पूर्वी सदर मिळकतीबाबत इतर कोणताही समझोता करार, साठेकारार, वचन चिठ्ठी, बयाना पावती, विकास करार मृत्यूपत्र, गहाणपत्र, बक्षीसपत्र, पोटगीहक्क, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह माझे अशील अथवा त्यांचे वतीने त्यांचे वकील यांच्या खालील नमूद कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद केलेली मिळकत निर्वेध आहे तसेच कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकतीच्या खरेदीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कागदोपत्री कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून व्यवहार पूर्ण करतील याची माहिती असावी.

टिप: मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारार्थ घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक - ०१ /१२/२०२३
ठिकाण - कर्जत

सही /-
मे.जमिर ॲटर्नी ॲण्ड कंपनी ऑफिस - शॉप नं. १२ बी, अमोल समर्थ सो.,महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, ओल्ड पनवेल, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.

जाहीर नोटीस

माझे अशिल मीना विरेन्द्र कुमार अग्रवाल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमीन मिळकतीचे मालक माधवप्रसाद गणेशमल तपारीया व अमित सज्जनकुमार गुप्ता यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भुमापन क्र. व उपविभाग	एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
मौजे माणगाव ठाकूरवाडी, ता.कर्जत जि.रायगड	२२/८/ब	०-८६-००	०.३६

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक :- ०१-१२-२०२३

ॲड. उमेश आनंद भगत
(अधिवक्ता)
मु.पो. चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
निविदा सूचना

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकरीता ६० शाखा व केंद्र कार्यालय तसेच एम.एस.सी.मुंबई व इतर अनुषंगिक टपालाकरिता कुरिअर सेवा पुरविणाऱ्या संस्थांकडून निविदा मागविण्यांत येत आहे. सदर निविदेमध्ये तपशीलवार दराचा उल्लेख असावा.

तरी इच्छुक निविदाधारकांनी सदरची निविदा दरासहीत दिनांक ०१-१२-२०२३ पासून दिनांक ०८-१२-२०२३ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची, कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — उपमुख्य कार्यकारी अधिकारी
दिनांक :- ०१-१२-२०२३

जाहीर नोटीस

माझे अशिल मीना विरेन्द्र कुमार अग्रवाल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक. १. दिपक ए. म्हात्रे, २. सौ. अंकिता रोहन पाटील पुर्वाश्रमीची अंकिता हरीश म्हात्रे ३. श्रीम. उषा हरीश म्हात्रे, ४. श्री. नयन हरीश म्हात्रे ५. श्री. विरेश हरीश म्हात्रे यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भूमापन क्र. व उपविभाग	एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
मौजे माणगाव ठाकूरवाडी, ता. कर्जत जि.रायगड	२२/१	०-५८-००	०.२८
	२२/२	०-९४-००	०.७५
	२२/३	१-७३-००	०.८७
	२२/४	०-७१-००	०.३७
	२२/७	१-१२-००	०.५९
	२२/९	१-३२-००	०.७५
	२२/१०	०-९४-००	०.५३
	२२/८/अ	०-८६-००	०.३६

वरील वर्णनाच्या शेत जमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लीज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक - ०१-१२-२०२३

ॲड. उमेश आनंद भगत
(अधिवक्ता)
मु.पो. चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड, मो.नं. ९०४९४८६८०५

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे

अ. क्र.	गाव व संचिका क्रमांक	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर.)	मंजूर पात्रता (चौ.मी.)	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशीसंबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	नावडे २१	नावडे ११अ	२०८/५ २०/१ ८०/० ८१/१ १८६/१ १८९/१ १९६/१	०-०४-० ०-२३-५ ०-०८-० ०-०९-० ०-२९-६ ०-४०-२ ०-०४-३	१५९९.७२ चौ.मी.	भूखंड क्र. ०७, सेक्टर १९A, क्षेत्र १६०० चौ.मी.	१)श्री. अरविंद पुंडलिक म्हात्रे (प्रथमपक्षी) तसेच २) श्रीमती विजया पुंडलिक म्हात्रे ३) श्री. विलास पुंडलिक म्हात्रे ४) सौ. गिता संजय पवार ५) सौ. स्मिता सुधीर कटेकर ६) सौ. निता संतोष चौधरी ७) सौ. यमुनाबाई गणपत म्हात्रे	निरंक
			अ.क्र.१ प्रमाणे	०-१८-६				
२.		नावडे ७+८	११२/६	०-२२-८				
३.		नावडे ११	९/१ १२/३ १९६/६	०-१४-९ ०-२३-० ०-०२-१				
			अ.क्र.३ प्रमाणे	०-४०-०				
			एकूण क्षेत्र (अ.क्र.१+२+३)	१-८१-४				
४.	दापोली १२५	दापोली १४२	१४८/३ B	०-३३-३	३०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. A-९, सेक्टर १५B, क्षेत्र २९९.८६ चौ.मी.	स्पे.मु.क्र. ३९२/२०१९ या दाव्यामधील नि.क्रं. ४३ वरील दि. ३०.०४.२०२१ रोजीच्या तडजोड पुरशीसनुसार श्री. राम कृष्णा गायकवाड (वादी क्र.१) व श्री. विजय कृष्णा गायकवाड (वादी क्र.२)	रे.मु.क्र. ४८/२००९ स्पे.मु.क्र. ३९२/२०१९ स्पे.मु.क्र. ३३४/२०१९
			एकूण	०-३३-३				
५.	उलवे ८५४	उलवे २७अ	६६/१९	०-११-०	१०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. १९२G, सेक्टर २३, क्षेत्र १९९.७० चौ.मी.	कै. कान्हा राघो मढवी (मयत) यांचे वारस १.१) श्री. मोतीराम कान्हा मढवी, १.२) कै. किशोर कान्हा मढवी (मयत) यांचे वारस १.२.१) श्रीमती नर्मदा किशोर मढवी, १.२.२) श्री. सोमनाथ किशोर मढवी, १.२.३) श्री. नितीन किशोर मढवी, १.२.४) श्री. निलेश किशोर मढवी, १.२.५) श्री. विशाल किशोर मढवी, १.२.६) श्रीमती प्रभावती मनोहर राजे, १.३) श्री एकनाथ कान्हा मढवी, १.४) श्री. रामचंद्र कान्हा मढवी, १.५) श्री. श्रीपत कान्हा मढवी, १.६) कै. सुनिल कान्हा मढवी (मयत) यांचे वारस १.६.१) श्रीमती सुनिता सुनिल मढवी, १.६.२) श्रीमती भाविका सुनिल मढवी	रे.मु.क्र. ३११/२०१४
		उलवे २७ब	६८/३ ६८/४	०-६३-९ ०-०५-०	६०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी.			

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)
सिडको/जनसंपर्क/४३४/२०२३-२४

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- पत्रावळी पेपर डीश मशीन विक्री आमच्याकडे पत्रावळी, पेपर डिश, मशीन मिळतील. तसेच सिल्व्हर व ग्रीन पेपर मिळेल. मुद्रा इंटरप्रायझेस पेण संपर्क : ८२३७४२४१२४
- श्री.सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी, धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- Wanted: Teachers, Typists and Office Assistants. Contact : Sindhu Teacher's Classes, 2nd Floor, Vishnu Mandir, Opposite Old Municipal Office, Alibag. Phone Numbers : 9422383196, 8551042000, 8551052000.
- अलिबागमधील किचन आणि इंटिरियरच्या ऑफिस कामासाठी Auto Cad Draftsman (मुलगी) पाहिजे. संपर्क : ९२६०१०१४४७
- Require a care taker/Estate Manager For residential Bunglow in Kihim Contact- 7506107657
- ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे. मो. ७४४७४८००००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कवडसे

अनुभवी खेळाडूंचा फायदा

अहमदाबाद : आयपीएलमध्ये अनेक अनुभवी खेळाडूंबरोबर खेळल्याचा मला कारकीर्दीत फायदाच झाला, असे भारतीय संघातील सलामीवीर शुभमन गिलने सांगितले. गुजरात टायटन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या पुन्हा मुंबई इंडियन्सकडे गेल्यानंतर संघाने गिलकडे कर्णधारपदाची धुरा सोपवली. कर्णधारपद ही एक जबाबदारी आहे. वचनबद्धता, शिस्त, कठोर मेहनत आणि निष्ठा या सगळ्या गोष्टी कर्णधारपदाबरोबर जोडल्या जातात. त्या पूर्ण करणे किंवा त्यात खरे उतरणे महत्त्वाचे असते, गिल म्हणाला.

धोनी पुन्हा एकदा सज्ज

चेन्नई : महेंद्रसिंग धोनी पुन्हा एकदा आयपीएलमध्ये आपली शानदार खेळी करण्यासाठी सज्ज झाला आहे. महेंद्रसिंग धोनी आयपीएल २०२४ मध्ये चेन्नईकडून खेळताना दिसणार आहे. चेन्नईचा संघ आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी सज्ज असल्याचे धोनीने लिलावापूर्वी सूचक वक्तव्य केले आहे. सध्या धोनी तंदुरुस्तीवर लक्ष्य केंद्रित करत आहे. माझी गुडघ्याची दुखापत सध्या बरी असून मी जिममध्ये घाम गाळत आहे, असे धोनीने म्हटले आहे.

तीन खेळाडू होणार मालामाल

नवी दिल्ली : भारतात नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेत आपल्या तडाखेबाज फलंदाजीने ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड, न्यूझीलंडचा रचिन रवींद्र आणि दक्षिण आफ्रिकेचा जेराल्ड कोएत्झी या तीन खेळाडू चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे आगामी आयपीएल हंगामात हे खेळाडू आपल्या संघात असावेत यासाठी संघव्यवस्थापन त्यांना चांगली बोली लावून खरेदी करण्याच्या तयारीत आहेत. १९ डिसेंबर रोजी खेळाडूंचा लिलाव पार पडणार असून, हे खेळाडू मालामाल होणार आहेत.

बेन स्टोक्सवर शस्त्रक्रिया

मुंबई : इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. स्टोक्सला अनेक दिवसांपासून गुडघ्याचा त्रास होता. यामुळे तो आयपीएल २०२३ चे अनेक सामने खेळू शकला नाही. त्याला डाव्या गुडघ्यात क्रॉनिक टेंडोनिटिसचा त्रास होता. त्याला यातून बरे होण्यासाठी ६ ते ७ आठवडे लागू शकतात. भारत दौऱ्यापर्यंत तो तंदुरुस्त होईल, असे इंग्लंड क्रिकेट बोर्डाकडून सांगण्यात आले आहे. इंग्लंडचा भारत दौरा २५ तारखेपासून सुरू होणार आहे.

विल्यमसनची शतकी खेळी

नवी दिल्ली : बांगलादेशविरुद्ध सुरू असलेल्या पहिल्या कसोटीत न्यूझीलंडचा कर्णधार विल्यमसननं शतक ठोकून भारताच्या विराट कोहली आणि ऑस्ट्रेलियाच्या ब्रडमनच्या २९ शतकांची बरोबरी केली आहे. आयसीसी क्रिकेट स्पर्धांमध्ये सचिन तेंडुलकरनंतर विराट कोहली दुसऱ्या स्थानी आहे. सचिनच्या नावावर १०० शतकं आहेत. विराट कोहलीच्या नावावर ८० शतकं आहेत. आता केन विल्यमसनकडे कोहलीला मागं टाकण्याची संधीदेखील उपलब्ध आहे.

मुंबई शहरचा कुमार संघ जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।

ठाणे येथे १ डिसेंबरपासून होणाऱ्या ५०व्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता मुंबई शहर कबड्डी असो.ने आपले संघ जाहीर केले. साई चौगुले, कादंबरी पेडणेकर यांच्याकडे मुंबई शहरच्या पूर्व विभागाचे नेतृत्व सोपविण्यात आले, तर सनी कोळी, रिया मडकईकर यांच्या खांद्यावर मुंबई शहरच्या पश्चिम विभागाची नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. निवडण्यात आलेले हे संघ १ डिसेंबर रोजी सकाळी स्पर्धेकरिता ठाण्याकडे रवाना होतील, अशी माहिती एका पत्रकाद्वारे सचिव विश्वास मोरे यांनी दिली.

कुमार संघ : साई चौगुले (संघनायक), विशाल लाड, निखिल कदम, सर्वदिप माने, सिद्धेश खांडेकर, आकाश साळवी, विवेक जाधव, अभिषेक बोंबले, प्रणील म्हात्रे, वेदांत सुतार, निकेश करकरे, राजू गुप्ता. प्रशिक्षक:- सुधीर वरखडे, व्यवस्थापक:- नितीन कदम.

कुमारी संघ : कादंबरी पेडणेकर (संघनायिका), लेखा शिंदे, अदिती काविलकर, वैष्णवी जाधव, तनिषा सिंग, सई शिंदे, मिताली गुरव, रुचिता पटेल, रिंपी सिंग, कृतिका चव्हाण, सौंदर्या दळवी, प्रिया दळवी. प्रशिक्षिका:- शुभांगी पाटील, व्यवस्थापक:- मधुकर पाटील

युगांडात क्रिकेटची क्रांती

संघ पहिल्यांदाच विश्वचषकासाठी पात्र

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

युगांडात क्रिकेट क्रांती झाली असून, संघाने इतिहास रचला आहे. युगांडाचा क्रिकेट संघ २०२४ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी पहिल्यांदाच पात्र ठरला आहे. ही स्पर्धा जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी पात्र ठरणारा युगांडा हा २० वा संघ ठरला आहे. दुसरीकडे, झिम्बाब्वे क्रिकेट संघाला सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकात स्थान मिळवता आले नाही.

टी-२० विश्वचषक स्पर्धेची पात्रता फेरी नामिबिया येथे पार पडली. युगांडा हा आफ्रिका खंडातील पात्रता फेरीत पात्र होणारा दुसरा संघ ठरला आहे. युगांडाने रवांडाचा ९ गड्यांनी पराभव करत विश्वचषकाचे तिकीट काढले. युगांडा पहिल्यांदाच टी-२० विश्वचषक स्पर्धेत खेळताना दिसणार आहे.

आगामी टी-२० विश्वचषक ३ जून ते ३० जून दरम्यान वेस्ट इंडिज आणि अमेरिकेमध्ये खेळवला जाणार आहे. २० संघांची ही स्पर्धा एकूण बाद फेरीसह तीन टप्प्यात खेळवली जाईल. सर्व २० संघ प्रत्येकी ४ च्या ५ गटात विभागले जातील. प्रत्येक गटातील अव्वल २ संघ सुपर-१० मध्ये प्रवेश करतील. यानंतर, सर्व दहा संघांना ५-५ च्या २ गटांमध्ये विभागले जाईल. सुपर-१० टप्प्यात दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. दोन संघ उपांत्य फेरीच्या दोन सामन्यांद्वारे अंतिम फेरीत प्रवेश करतील.

झिम्बाब्वेला दुसऱ्यांदा नारळ

आफ्रिकन रिजमधील दोन संघ आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२४ साठी पात्र ठरणार होते, ज्यामध्ये नामिबियाने पहिला संघ म्हणून आपले स्थान निश्चित केले, तर युगांडा संघ दुसरा आणि शेवटचा संघ म्हणून आपले स्थान निश्चित करण्यात यशस्वी झाला.

स्पर्धेसाठी पात्र झालेले संघ

युगांडाच्या आधी वेस्ट इंडिज, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, नेदरलँड, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, आयर्लंड, स्कॉटलंड, पापुआ न्यू गिनी, कॅनडा, नेपाळ, ओमान आणि नामिबियाचे संघ पात्र ठरले आहेत.

रायगडातील कराटेपटूंना प्रशिक्षण

। रसायनी । वार्ताहर ।

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर आणि ब्लॅक बेल्ट एक्साम पार पडले. या शिबिरामध्ये खालापूर, पनवेल, खोपोली, पेण, कर्जत, तालुक्यातील एकूण ७० कराटेपटू सहभागी झाले होते.

या शिबिरात ब्लॅक बेल्ट एक्साम आणि डिग्री एक्सामामध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

ब्लॅक बेल्ट:- राजेंद्र कान्हेरे, प्रथम बहिरा, पंक्ती पाठक, हर्षल घरत, किसन बोगटी, सानवी जाधव, आदित्य खाडे, जयराज बोराडे, हार्दिक तुरे, ऋतुजा जाधव, संदेश सुनार, धनंजय शर्मा. प्रथम डिग्री ब्लॅक बेल्ट :- आस्था चौधरी, रुत्वी पाटील, आलोक निर्मल, कृपाश्री शेट्टी,अथर्व रांजणे. तृतीय डिग्री ब्लॅक बेल्ट :- परशुराम शेट्टीगिरी हयांनी सुयश संपादित केले. शिबिरादरम्यान महाराष्ट्र पोलीस कमांडो ट्रेनर हांशी प्रदीप मोहिते, शिहान सुनील वडके यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तसेच शिहान रवींद्र म्हात्रे, सागर कोळी, पियुष सदावर्ते, निलेश भोसले, प्रशांत गांगुर्डे, सेन्सई भालचंद्र भोईर, जीवन धाकवळ, संदीप आगीवले, संजय पाटील, प्रवीण पाटील, प्रतिक कारंडे यांनी प्रशिक्षण दिले. सर्व उत्तीर्ण खेळाडूंचे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ज्ञानगंगा ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

अर्धमॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

। कोर्लई । प्रतिनिधी ।

अलिबागच्या ज्ञानगंगा शिक्षक विद्यार्थी कल्याणकारी ट्रस्ट'ला दोन वर्षे पूर्ण झाली असून, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी ट्रस्टतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याचाच एक भाग येथील आरसीएफच्या क्रीडासंकुल परिसरातील अंतर्गत रस्त्यावर अर्धमॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

शालेय विद्यार्थ्यांसहित शिक्षकांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे अत्यावश्यक आहे. अशा स्पर्धांमुळे सराव वाढून त्यांच्यामध्ये व्यायामाची आवड आणि सातत्य टिकून राहते. धावण्याच्या व्यायामातून तंदुरुस्त राहून, शारीरिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासह सुदृढ विद्यार्थ्यांची पिढी घडविण्यासाठी सदर स्पर्धा आयोजित केल्याचे यावेळी आयोजकांनी सांगितले.

विविध पाच गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत दोनशेहून अधिक विद्यार्थी, तर साठहून अधिक शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांमध्ये छोटा आणि मोठा गट, मुली, पन्नास वर्षांहून कमी वयाचे शिक्षक तसेच पन्नास वर्षांहून अधिक वयाचे शिक्षक, शिक्षिका यावेळी स्पर्धेत उत्साहाने सहभागी झाल्याचे दिसून आले. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजयी स्पर्धकांसह दोन स्पर्धकांना उत्तेजनार्थ आकर्षक ट्रॉफी, तर सहभागी स्पर्धकांनाही प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये संस्थेचे अध्यक्ष वैभव पिंगळे, उपाध्यक्ष प्रतिभा पाटील, सचिव सुबोध पाटील, खजिनदार अजित हरवडे, प्रमुख सल्लागार प्रमोद भोपी, कार्यकारी मंडळ सदस्य महेश कवळे, जयवंत वाणी, दयानंद अंजर्लेकर, नित्यनाथ म्हात्रे, उमेश ठाकूर, विनायक भोनकर, सुभाष मोकल, मनिषा अंजर्लेकर, विजय गुरव, निलेश तुरे, विश्वास पाटील, ज्योती घरत, संजय पोईलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राथमिक शिक्षक संघ रायगड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, नरेंद्र गुरव, सुनील पाटील, विलास पाटील, रवींद्र थळे, प्रवीण पाटील, जितेंद्र पाटील, दीपक पाटील, अनिल नाईक, संदीप पाटील, दिलीप झावरे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यात महत्त्वाचे योगदान दिले.

तिलक वर्माचा पत्ता कट?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील चौथा सामना उद्या शुक्रवार, दि. १ डिसेंबर रोजी संध्याकाळी सात वाजता रायपूर येथे खेळला जाणार आहे. तिसऱ्या सामन्यात भारताला पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे चौथ्या सामन्यासाठी संघात बदल करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामध्ये श्रेयस अय्यर यासामन्यात पुनरागमन करणार हे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे तिलक वर्माला बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो.

बेंचप्रेस स्पर्धेत रायगडला तीन पदकं

। अलिबाग । वार्ताहर ।

बंगळुरू येथे राष्ट्रीय क्लासिक आणि इक्विप बेंच प्रेस स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. यामध्ये खुल्या गटातील स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात रायगडच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू अक्षय शनमूगम (आयर्न मेट जिम खोपोली) याने नवीन राष्ट्रीय विक्रम करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. तसेच ज्युनियर स्पर्धेत तन्मय पाटील (संसारे फिटनेस पेण) याने रौप्यपदक, तर मास्टर स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात दिनेश पवार (लोखंडे जिम खोपोली) याने कांस्यपदक मिळविले.

या तिन्ही पदकविजेत्या खेळाडूंचे आणि त्यांचे प्रशिक्षक, जिम संचालक यांचे संघटनेने कौतुक केले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले होते. या तिन्ही पदक प्राप्त खेळाडूंचे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्यावतीने अध्यक्ष गिरीश वेधक, उपाध्यक्ष श्रीनिवास भाटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सचिव पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, राहुल गजरमल, माधव पंडित, दत्तात्रय मोरे, सुभाष टेंबे, संदीप पाटकर यांनी अभिनंदन केले.

सुवर्ण- अक्षय षणमुगम. रौप्य - तन्मय पाटील. कांस्य- दिनेश पवार.

म्हसळ्यात हिवाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन

। म्हसळा । वार्ताहर ।

श्रम एवम जयते हे ब्रीद वाक्य घेऊन तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य कार्य करीत असलेली सोमजाई माता क्रीडा मंडळ ट्रस्ट खरसई आणि पंचायत समिती म्हसळा शिक्षण विभागाच्या वतीने शालेय हिवाळी क्रीडा स्पर्धा दि. २ व ३ डिसेंबर रोजी खरसई येथे सामाजिक सभागृहाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आल्या आहेत.

स्पर्धेत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. स्पर्धेत कबड्डी, खो-खो, लांब उडी, उंच उडी, रिले स्पर्धा, गोळाफेक, थाळीफेक आणि योगा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सोमजाई क्रीडा मंडळाचे विश्वस्त आणि शिक्षण विभागाचे सर्व शिक्षकवृंद यांनी जोमाने तयारी केली असून, स्पर्धकांना दोन दिवस भोजन व्यवस्था करण्यात आली असल्याचे संस्थाप्रमुख चंद्रकांत खोत यांनी कळविले आहे. ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी वर्गाला शिक्षणाबरोबरच आयोजित क्रीडा स्पर्धांत प्रोत्साहन मिळणार आहे.

झारखंडचा विदर्भाकडून धुव्वा

। नागपूर । प्रतिनिधी ।

विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेतील 'ब' गटात विदर्भाची विजयी मालिका कायम असून, त्यांनी झारखंडचा दहा गड्यांनी धुव्वा उडवत सलग चौथ्या विजयाची नोंद केली. जयपूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत विदर्भ संघ आता १६ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. यश ठाकूर, दर्शन नळकांडे आणि अक्षय कर्णेवारच्या गोलंदाजीच्या जोरावर विदर्भाने झारखंडचा डाव अवघ्या १०७ धावांवर गुंडाळला. झारखंडकडून अनुकूल रॉयने सर्वाधिक २५ धावा केल्या. यश ठाकूरने तीन फलंदाज बाद केले.

विराटमध्ये अजून बरंच क्रिकेट बाकी

सचिन तेंडुलकरने व्यक्त केला विश्वास

। मुंबई । प्रतिनिधी ।

विराटमध्ये अजून बरंच बरंच क्रिकेट (प्रेम) शिल्लक आहे आणि त्याने अजून खूप धावा करणं शिल्लक आहे. धावांची भूक आणि देशासाठी आणखी काही साध्य करण्याची इच्छा त्याच्यात कायम टिकून राहावी, असे उद्गार मास्टर बास्टर सचिन तेंडुलकरने काढले. एका मुलाखतीत बोलताना विराट कोहलीच्या क्रिकेटमधील भविष्याविषयी भाष्य केलं.

तेंडुलकर म्हणाला की, विराटला भारताकडून खेळण्याआधीही मी पाहिले आहे. मी त्याला मोठं होताना पाहिले आहे, आणि मग तोच खेळाडू देशासाठी अशा अद्भुत गोष्टी साध्य करतो हे पाहून मला खूप आनंद झाला आहे.

आणि मला खात्री आहे त्याचा प्रवास थांबला नाहीये. दरम्यान, तेंडुलकरने विश्वचषकाच्या वेळी सुद्धा विराट कोहलीची एक खास आठवण शेअर करत त्याचे अभिनंदन केले होते. कोहली जेव्हा पहिल्यांदा ड्रेसिंग रूममध्ये आला होता तेव्हा बाकीच्या खेळाडूंनी गमतीत त्याला माझा आशीर्वाद घेण्यासाठी पाया पडायला सांगितले होते. विराट बरोबर मी ड्रेसिंग रूम शेअर केली आहे आणि त्याची नवी प्रगती अभिमानास्पद आहे असेही तेंडुलकरने म्हटले होते.

विजय हजारे ट्रॉफी

मुंबईचा सलग चौथा विजय

। मुंबई । प्रतिनिधी ।

विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत मुंबईने आपला दरारा कायम ठेवताना विजयाचा चौकार मारला. सलग चौथा विजयही फार मोठ्या फरकाने मिळवताना पुदुचेरीवर सात विकेट आणि तब्बल २२५ चेंडू राखून मात केली.

मुंबईच्या वेगवान माऱ्यापुढे पुदुचेरीच्या फलंदाजांचा निभाव लागला नाही. अवघ्या २४.४ षटकांत त्यांचा डाव ६७ धावांत संपला, मुंबईने हे आव्हान १२.३ षटकांत पार केले असले तरी तीन फलंदाज गमावले. मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणे पुन्हा अपयशी ठरला. तो ८ धावाच करू शकला. गेल्या सामन्यातील शतकवीर जय बिस्ताने १७ धावा केल्या; परंतु त्यासाठी त्याने ३१ चेंडू घेतले. वेगवान गोलंजाजीसाठी पोषक असलेल्या सकाळच्या वातवरणात तुषार देशपांडेने फारच भेदक मारा केला. त्याने ११ धावांच ४ विकेट मिळवल्या. त्यानंतर शम्स मुलानी आणि अथर्व अकोलेकर यांनी प्रभाव पाडला. पुदुचेरीकडून परमेश्वरन शिवरामन याची १९ धावांची खेळी सर्वाधिक ठरली. सलग चौथ्या विजयासह मुंबई 'अ' गटात १६ गुणांसह आघाडीवर आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांची निव्वळ सरासरी ३.१०६ अशी अतिशय बळकट आहे.

द्रविडच देणारा संघाला धडे; बीसीसीआयकडून शिक्कामोर्तब

भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी पुन्हा निवड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

राहुल द्रविड च भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहे. बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिली. राहुल द्रविडसह सर्व प्रशिक्षकांचा कालावधी वाढवण्यात आला आहे. एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यानंतर राहुल द्रविडचा कार्यकाळ संपला होता. बीसीसीआयने राहुल द्रविड याला कार्यकाळ वाढवण्याची विनंती केली होती. द्रविडनेही ही संधी स्वीकारली आहे. व्हीव्हीएस लक्ष्मण एनसीए प्रमुख म्हणूनच काम पाहणार आहे. त्याशिवाय तो राखीव मुख्य प्रशिक्षक असेल. म्हणजेच, राहुल द्रविडच्या अनुपस्थितीत लक्ष्मण भारतीय संघाला धडे देणार आहे.

राहुल द्रविड यांनी गेली २० वर्ष भारतीय क्रिकेट संघासोबत एक खेळाडू, कर्णधार आणि प्रशिक्षक म्हणून प्रवास केला. राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२२ टी-२० विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठली होती. त्याशिवाय २०२१-२३ चॅम्पियन्स चषकाचही अंतिम फेरी गाठली. तसेच २०२३ विश्वचषक अंतिम फेरीही गाठली होती. अंतिम सामन्यामध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला. भारतीय संघाने लागोपाठ १० सामन्यांत विजय मिळवला होता.

राहुल द्रविड म्हणाला की, भारतीय संघासोबतची गेली दोन वर्षे अविस्मरणीय राहिली आहेत. आम्ही एकत्रपणे चढ-उतार पाहिले आहेत आणि या संपूर्ण प्रवासात संघातील पाठिंबा आणि विश्वास कायम आहे. आम्ही ड्रेसिंग रुममध्ये निर्माण केलेलं वातावरण आणि संस्कृतीचा मला खरोखर अभिमान आहे. ही एक लवचिक संस्कृती आहे, जी विजयाच्या किंवा प्रतिकूल परिस्थितीतही आमच्यासोबत आहे. आपल्या संघाकडे असलेली कौशल्ये आणि प्रतिभा अभूतपूर्व आहे आणि आम्ही ज्यावर भर दिला आहे. योग्य प्रक्रियेचे अनुसरण करणे आणि आमच्या सराव कायम ठेवणे, ज्याचा एकूण कामगिरीवर थेट परिणाम झाला आहे.

राहुलमुळे संघाची भरभराट

राहुल द्रविडची दूरदृष्टी, व्यावसायिकता आणि अथक प्रयत्न हे टीम इंडियाच्या यशाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक या नात्याने राहुल द्रविडची नेहमीच छाननी होत असते. फक्त आव्हाने स्वीकारल्याबद्दलच नव्हे तर, त्यात भरभराट केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. भारतीय संघाची कामगिरी, धोरणात्मक मार्गदर्शनाचा पुरावा आहे. मुख्य प्रशिक्षकपदाची संधी स्वीकारल्याचा आनंद आहे, असे बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी म्हणाले.

"माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल, माझ्या दूरदृष्टीला पाठिंबा दिल्याबद्दल बीसीसीआय आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानतो. या भूमिकेत राहण्यासाठी बराच वेळ घरापासून दूर राहणे आवश्यक आहे आणि मी माझ्या कुटुंबाच्या त्याग आणि समर्थनाचं मनापासून कौतुक करतो. त्यांची पडद्यामागची भूमिका मोलाची आहे. आम्ही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी वचनबद्ध आहोत. - राहुल द्रविड, मुख्य प्रशिक्षक

"भारतीय संघाचा कोच म्हणून राहुल द्रविडपेक्षा चांगला कुणीही नाही, असे मी आधीच सांगितले होते. द्रविडने स्वतःला पुन्हा सिद्ध केले आहे. भारतीय संघ आता एक मजबूत असून, तिन्ही प्रकारामध्ये अव्वल आहे. राहुल द्रविड यांचं मार्गदर्शन आणि संघासाठी तयार केलेल्या मेहनतीतून ते दिसतेय. संघाच्या भरभराटीसाठी योग्य व्यासपीठ तयार केल्याबद्दल राहुल द्रविड कौतुकास पात्र आहे. त्यांना पूर्ण पाठिंबा असेल.
- जय शाह, सचिव, बीसीसीआय

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)